१२३६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८१७.
६२२

# शिवाजींचें अवतार-कार्य

निबंध ६२
१।१९५३
७७७५

स. रं. सुंठणकर.

REFBK-0005443

निबंध १९६

# शिवाजीचें अवतार कार्य.

*( An essay on the mission of Shivaji's life. )*



मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ५४४३
ग्रंथ : शाखा
REFBK-0005443

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥

—भगवद्गीता.

लेखकः—

स. रं. सुंठणकर, एल. एल. बी., धारवाड.

किंमत ] २६।१।१९३६. [ सहा आणे.

# अर्पण-पत्रिका.

जिच्याकडून मला हिंदु संस्कृतीचें बाळकडू
मिळालें अशा माझ्या परमपूज्य
मातुःश्रीच्या पवित्र चरणीं हें
पुस्तक प्रेमातिशयानें
अर्पण केलें
आहे.

—स. रं. सुंठणकर.

# निवेदन.

फर्ग्युसन कॉलेजमध्यें असतां शिवाजी महाराजांसंबंधीं बहुतेक सर्व वाङ्मयाचा मी प्रथम अभ्यास केला, तेव्हां मला असें वाटलें कीं एतद्विषयक इंग्रजींत व मराठींत मोठमोठाले पुष्कळ ग्रंथ उपलब्ध असले, तरी ज्यांना विस्तृत मोठाले ग्रंथ वाचण्याची सवड अगर संवय नाहीं अशा सामान्य वाचक वर्गाकरितां शिवचरित्रांतील रहस्य काय व सांप्रतकाळीं ह्मणजे राष्ट्राच्या हीनावस्थेंत शिवचरित्र किती बोधप्रद व स्फूर्तिदायक आहे, याचें थोडक्यांत विवेचन करणारें एकादें छोटेंसें पुस्तक लिहावें. परंतु घरगुती अडचणीमुळें व इतर व्यवसायामुळें हा योग आजवर जमून आला नाहीं. पुढें गतसालीं येथील कर्नाटक महाराष्ट्र मंडळातर्फे शिवजयंतीच्या उत्सवप्रसंगी मी एक व्याख्यान दिलें. तें व्याख्यान आणखी त्यांत भर घालून मी लिहून काढिलें, व प्रसिद्धिकरितां अकोल्याच्या ' मातृभूमी ' या वृत्तपत्राकडे पाठविलें. 'मातृभूमी' नें माझ्या लेखाचा साभार स्वीकार करून तो आपल्या सात अंकांत छापिला, याबद्दल 'मातृभूमीचे' मजवर बहुत उपकार झाले आहेत.मातृभूमींतील तीच लेखमाला विशेष फेरफार न करतां आजरोजीं ग्रंथरूपानें प्रसिद्ध करीत आहे.

हा ग्रंथ लिहिण्याचे कामीं रा. सा. सरदेसाई यांच्या रियासती, न्या. रानडे यांचें ' The rise of the Maratha power ' हें पुस्तक, प्रो. जदुनाथ सरकार यांचा ' Shivaji and his times हा ग्रंथ, व श्री. न. चिं. केळकर यांचें ' मराठे व इंग्रज ' हें पुस्तक , या समस्त ग्रंथांचा मला फार उपयोग झाला. त्यांतल्या त्यांत सरदेसायांच्या रियासती वाचून माझें शिवाजी महाराजावरील प्रेम शतगुणित

झाल्यामुळें व हिंदुस्थानच्या इतिहासावर माझी निरतिशय प्रीति जडल्यामुळें रियासतकारांचा मी आजन्म ऋणीच आहे; किंबहुना हें पुस्तक ह्मणजे माझ्या रियासतींच्या वाचनाचेंच फळ होय ! सर्व महाराष्ट्रीय तरुणांना त्यांच्या रियासती वाचण्याबद्दल मी कळकळीची विनंती करतो. शिवाय डॉ. बाळकृष्ण, भारताचार्य वैद्य, श्री. केळुसकर व प्रो. टाकाखाऊ यांच्या ग्रंथांचा प्रत्यक्ष आधार घेतला नसला तरी त्यांच्या ग्रंथाचें मजकडून अवलोकन झालें असल्यामुळे त्यांची विचारसरणी अप्रत्यक्षपणें या पुस्तकांत समाविष्ट होणे सहाजिकच आहे. याखेरीज श्री. र. वा. जठार, श्री. द. प. करमरकर, श्री. अ. प. करमरकर, श्री. द. भ. वाघ इत्यादि माझ्या परम स्नेह्यांची सहानुभूति, सहाय्य व प्रोत्साहन हीं मला लाभली नसतीं, तर या पुस्तकाचें प्रकाशन होणें जवळ जवळ अशक्य झालें असतें. तसेंच बेळगांव येथील ‘ तरुण भारत ’ वृत्तपत्राचें संस्थापक श्री. बाबूराव ठाकूर यांनीं हें पुस्तक छापण्याच्या कामीं बरेच परिश्रम घेतले आहेत, ह्मणून वर नमूद केलेल्या व्यक्तींचे मी मनःपूर्वक आभार मानतो. या प्रबंधांत पुष्कळ दोष असणार हें मी जाणून आहे. परंतु ‘ सर्वारंभाहि दोषेण ’ ही भगवदुक्ति लक्षांत घेऊन उदार-मनस्क वाचक-स्वरूप वासुदेव मला या ग्रंथांतील दोषांबद्दल क्षमा करील अशी पूर्ण आशा आहे. पुस्तकास अखेर परिशिष्ट जोडिलें असून त्यांत बॅरिस्टर जयस्वाल यांचा शिवशासन पद्धतीवरील अभिप्राय व चितोडच्या आदि पुरुषापासून शिवाजीमहाराजापर्यंत भोसले घराण्याची वंशावळ हीं दिलीं आहेत.

धारवाड.
ता २६।१।३६

स. रं. सुंठणकर.

# विषयानुक्रमणिका.

( १ ) हिंदूंचा पूर्वेतिहास—हिंदूंचे प्राचीन पराक्रम—हिंदूंचे मानसिक दौर्बल्य—दक्षिणेतील परिस्थिती—हिंदवी स्वराज्याची शपथ—हिंदूंचे राष्ट्रीकरण. ( १ ते ८ )

( २ ) भोसले घराण्याची पूर्वपीठिका—शिवाजीचा जन्म—बालपणचे सुंदर वातावरण—शिवाजीची सद्गुणजंत्री—सर्वगामी अष्टपैलू बुद्धिमत्ता—शिवाजीची कल्पकता व शाइस्तेखानाची दुर्दशा—सुरतेवर छापा आणि पुण्याच्या मगरामिठीची सुटका—अप्रतिम धाडस. ( ९ ते १६ )

( ३ ) शिवाजीची विधायक बुद्धिमत्ता—शिवाजीला स्वार्थ ठाऊक नव्हता—जहागिरीविरुद्ध शिवाजीचा कटाक्ष—शिवाजीची मुलकी व्यवस्था—रयतेशी प्रत्यक्ष संबंध—शिवाजीचें लष्कर—गुप्त हेरांचे जाळे—शिवाजीचे आरमार—शिवाजीचे दूरदर्शित्व व मुत्सद्देगिरी—शिवाजीचें किल्ले. ( १७ ते २५ )

( ४ ) स्वराज्याची मजबूत संघटना व न्या. रानड्यांचा अभिप्राय—स्वधर्म व स्वातंत्र्य यासाठीं सारखी तळमळ—सावधगिरी व उद्यमशीलता—जनचित्ताकर्षक शक्ती व लोकसंग्रह—मानवी स्वभाव परिक्षण—समदृष्टी—चौकसबुद्धि—शिवाजीची कडक शिस्त व नियम. ( २६ ते ३३ )

( ५ ) शिवाजीची लूट ह्मणजे स्वराज्य–भिक्षा–शत्रूंना कम जोर करण्याचे साधन–शिवाजी वज्रापेक्षां कठोर व मेणापेक्षां मऊ–सपिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः–शिवाजीचें औदार्य–खंबीर नीतिमत्ता–उत्कट धर्मप्रेम–शिवाजी व रामदास–शिवाजीनें अंतकाळीं केलेला दिव्य गीतोपदेश–परधर्म सहिष्णुता व शिवाजीचें औरंगजेबास पत्र. ( ३३ ते ३९ )

( ६ ) शिवाजीची धर्मप्रीति कट्टर नव्हती–मराठी व संस्कृत भाषांस उत्तेजन–स्वावलंबन–संपूर्ण विनयशीलता–मधुर व मितभाषिणी–राहणी अगदीं साधी–टापटीप काटकसर व हिशेब–शिवाजीचे राज्य चिरस्थायी कां झाले नाहीं ? ( ४० ते ४५ )

( ७ ) शिवाजीची योग्यता–महाराष्ट्राच्या इतिहासांत शिवाजीचें स्थान–जागतिक इतिहासांत शिवाजीचें स्थान–शिवाजीचा हिंदी राष्ट्राला संदेश–शिवचरित्रापासून बोध. ( ४६ ते ५० ).
परिशिष्ट.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४६३

# शिवाजीचें अवतार कार्य.

Shivaji has shown that the tree of Hinduism is not really dead, that it can rise from beneath the seemingly crushing load of centuries of political bondage, exclusion from the administration, and legal repression, it can put forth new leaves and branches, it can again lift up its head to the skies *

—Jadunath Sarkar.

१

## हिंदूंचा पूर्वेतिहास.

इटलीला जसा मॅझिनी, अमेरिकेला जसा वाशिंग्टन, रशियाला जसा लेनिन तसा आम्हां भारतीयांना विशेषतः हिंदूंना शिवाजी अत्यंत पूज्य वाटतो. तेव्हां भरतखंडास ललामभूत झालेल्या अशा या दिव्य महात्म्याचें अवतारकार्य

* **अर्थः**—शिवाजीनें उद्यास येऊन जगाच्या निदर्शनास असें आणून दिलें कीं हिंदुसंस्कृतिरूपी वृक्ष मृतप्राय झाला नसून तो शेकडों

कोणतें, त्या कार्याला आधारभूत असा कोणत्या सद्गुणांचा साठा या विभूतीच्या ठायीं वास करीत होता, कोणत्या परिस्थितींत त्याचा जन्म झाला, त्याला केवळ महाराष्ट्रांतल्या अगर हिंदुस्थानांतल्याच नव्हे तर जगांतल्या इतिहासांत कोणतें स्थान द्यावें व त्याच्या चरित्रापासून काय बोध घ्यावा याचा या प्रबंधांत सांगोपांग विचार करण्याचें योजिलें आहे. शिवाजीनें असें कोणतें कार्य केलें आहे कीं ज्यायोगें त्यानें हिंदूंना कायमचें ऋणी केलें असून त्याच्या केवळ स्मरणानें हिंदूंच्या राष्ट्रीय भावना जागृत होतात, हें शिवाजीचें कार्यचित्र उठावदार दिसून येण्यास शिवाजीच्या पूर्वकालचा हिंदूंचा पूर्वेतिहास पार्श्वभूमिका या नात्यानें दाखविणें जरूर पडतें. शिवाजी-पूर्वकालीन हिंदूंनीं अगदींच पराक्रम केला नाहीं, असें नाहीं. मुसलमानांच्या स्वाऱ्या या देशावर होण्यापूर्वी परकीयांच्या पुष्कळ स्वाऱ्या हिंदूंनीं परतविल्या आहेत. इराणापासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेलें अशोकाचें साम्राज्य जगजाहीर आहेच.

## हिंदूंचें प्राचीन पराक्रम.

सिकंदर बादशहाच्या स्वारीनंतर शहाबुद्दीन घोरीच्या स्वारी-पर्यंत जीं पंधराशें वर्षें गेलीं, तेवढ्या काळांत या देशावर परकीयांच्या

---

वर्षांच्या दास्यशृंखला, राज्यकारभारांतून अर्धचंद्र व कायदेशीर मुस्कट-दाबी या त्रिदोषात्मक जबर दडपणांतूनही आपला प्रभाव गाजवूं शकतो. त्याला नवीन पालवी फुटून फांद्या येतात, इतकेंच नव्हें तर त्याचा आकाशास भिडणारा असा गगनचुंबी वृक्ष बनतो.

—जदुनाथ सरकार.

स्वाऱ्या एकामागून एक येत होत्या; तितक्याही येथचे लोक मागें हटवून स्वतःची सत्ता कायम राखीत होते. सिकंदर बादशहाचें येथें वास्तव्य झालेंच नाहीं. त्याचें कांहीं लोक मागें राहिलें, त्यांस चंद्रगुप्तानें घालवून दिलें. पुढें शंभर वर्षांनीं वायव्येकडील बॅक्ट्रिया देशांतून ग्रीक लोकांनीं पुनः हिंदुस्थानावर स्वारी केली, त्या वेळीं मगध देशाचा राजा पुष्पमित्र व त्याचे सेनापति ह्यांनीं इ. सनापूर्वी १५० च्या सुमारास त्या यवनांस बाहेर घालवून दिलें. यवनानंतर शक आले, त्यांनीं तक्षशिला व मथुरा येथें सुमारें शंभर वर्षें राज्य केलें. त्यांचा पाडाव इ. सनापूर्वी ५७ च्या सुमारास उज्जयनीच्या विक्रमादित्यानें केला. नंतर पश्चिमेकडून शकांची दुसरी एक टोळी आली. त्यांचा राजा नहपान याचा गौतमीपुत्र पुलुमायि शातकर्णी यानें इ. स. १२६ त पराभव केला. त्यानंतर यूची नांवाचे लोक हिंदुस्थानावर आले. त्यांचे राजे कनिष्क, हविष्क व वासुदेव यांनीं शंभर वर्षें पावेतों पंजाब व सभोंवारच्या प्रदेशावर राज्य केलें. त्यांचा पाडाव गुप्तवंशी प्रबल राजा समुद्रगुप्त यानें चवथ्या शतकांत केला. पांचव्या शतकांत श्वेतहूण लोक हिंदुस्थानावर चालून आले, त्यांचा दुष्ट राजा मिहिरकुल ह्यास सहाव्या शतकांत यशोधर्मा राजानें जिंकिलें.तरी सातव्या शतकांत पुनरपि हूण लोक हिंदुस्थानांत आले, त्यांस कनोजच्या श्रीहर्षानें कायमचें घालवून दिलें. त्यानंतर सुमारें तीनशें वर्षें पावेतो हिंदुस्थानावर परचक्र आलें नाहीं. पुढें गजनीचा महंमूद चालून आला; त्याजपुढें हिंदू हार पावले, तथापि त्यांनीं स्वराज्य घालविलें नाहीं. आणखी दोनशें वर्षें गेल्यावर महंमद घोरी हिंदुस्थानावर आला. त्याजला अडविणारा शेवटचा शूर वीर पृथ्वीराज होय. परंतु त्या सामन्यांत पृथ्वीराजाचा

पाडाव होऊन आर्यांचें स्वातंत्र्य नष्ट होण्यास प्रारंभ झाला.

## हिंदूंचें मानसिक दौर्बल्य.

पण या सर्व कालांत युद्धाची अगर राज्याची अगर सार्वजनिक कार्यांची सर्व जबाबदारी काय ती क्षत्रिय वर्गाची ! इतर वर्गांनीं व जातींनी आपापले उद्योग धंदे करून अहिंसेचा जप करीत आरामींत काल कंठावा, हीच काय ती त्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता होऊन बसली होती. अशी भावना दृढमूल होऊन समाजाचें तदनुवर्तन झाल्याकारणानें बहुसंख्य समाज निःसत्व, नादान, आळशी, कमकुवत व अखेर अखेर भित्रा व पळपुटा बनून त्याचे संगतीनें ' संगतिःसंगदोषाः ' या न्यायानें क्षत्रिय वर्ग हळुहळू निस्तेज, कमकुवत व नित्राण बनत चालला. अशा परिस्थितींत क्षत्रिय वर्ग पूर्ण पराजित होऊन हिंदुस्थानांत मुसलमानांचें राज्य प्रस्थापित झालें; यायोगें क्षत्रियाऐवजीं राज्य काय तें मुसलमानांनीं करावयाचें व हिंदूंनीं त्यांचें अंकित राहून त्यांना सर्वतोपरी मदत करून त्यांच्या तंत्रानें चालावयाचें अशी भावना रूढ होत चालली. हिंदूंना आपलें स्वतंत्र राज्य स्थापण्याची (इ. स. १२०० पासून १६०० पर्यंत) बुद्धि झालीच नाहीं. हळुहळू संवयीमुळें मुसलमानांनीं हिंदूंचे कितीही हाल केले तरी त्यांचा त्वेष सुद्धां येईनाशी नादान स्थिति उत्तरेंत प्रादुर्भूत झाली. नाहींतर खुलूनें हिंदूंच्यातर्फे बंड केल्यावेळीं अगर बाबर हिंदुस्थानांत आल्यावेळीं हिंदूंना आपलें साम्राज्य स्थापण्याची चांगली संधि होती, ती त्यांनीं वायां दडवली. नंतर मोंगल बादशाही स्थापन झाल्यानंतर 'दिल्ली राजधानी' व

१११२१३

'मोंगल बादशहा' या भावनांचें साहचर्य लोकांच्या मनांत कायमचें बसून गेलें होतें. अशा प्रकारचीच भावना ब्रिटिशांच्या विषयीं १९ व्या शतकांत व २० व्या शतकारंभीं सर्वत्रांची होती. ह्मणजे राज्य करावें तर ब्रिटीशांनीं! आह्मी अगदीं नालायक, केवळ त्यांचे बंदे होऊन राहण्याच्या योग्यतेचे! या भावनेचें लोकांच्या हृदयांतून उच्चाटन करितां करितां टिळक गांधींना नाकीं नव आले.

## दक्षिणेंतील परिस्थिति.

दक्षिणेंतला प्रकार थोडा निराळा होता. बहामनी राज्याशीं व मुसलमानांच्या वाढत्या शक्तीशीं टक्कर देण्याकरितांच विजयनगरचा उदय झाला. पुढें विजयनगरचा पाडाव झाला तरी तें स्वातंत्र्याचें उदाहरण शिवाजीच्या नजरेसमोर होतें. विजयनगरच्या राज्याची भिस्त पराक्रमापेक्षां व्यापार व संपत्ति यांवर असल्यामुळें तेथें हिंदूंच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेचा उगम झाला, तरी त्यांच्यांत संघटना, जोम व पराक्रम हीं आलीं नव्हतीं. तेंही राज्य बुडाल्यानंतर दक्षिणेंतही राज्य मुसलमानांनीं करावें, हिंदूंनीं त्याना सर्वतोपरी मदत करावी, पण हिंदुस्थानचें भवितव्य ठरविण्याचा हक्क काय तो मुसलमानांचा, हिंदूंनीं 'हरिहरि' ह्मणत आपुल्या आयुष्याचे दिवस कसेबसे कंठीत स्वस्थ बसावें. अशा प्रकारच्या भावना दृढमूल होत चालल्या, याचा परिणाम असा झाला कीं, आमच्या बुद्धि-शक्तींचा उपयोग मुसलमानांनीं करून घेतला. राज्यांतील वसुलीचें व व्यवस्थेचें काम हिंदू करीत असत. बहामनी राज्यांत तर हिंदूवरच सर्व भिस्त होती, तेथील फौजेंतील मोठमोठे कामदार बहुतेक हिंदूच होते. हिंदूंचेंच

वजन मुसलमानावर पडलें होतें. हिंदूंच्या मदतीशिवाय मुसलमानांचें कांहीं चालणारें नव्हतें. अशी वस्तुस्थिति असूनही हिंदू समाजाची व धर्माची मात्र अत्यंत केविलवाणी स्थिति झाली होती. सामान्य हिंदुसमाज भित्रा पळपुटा होता. एकादी मुसलमानांची टोळी आली कीं, गांवचीं गांवें ओसाड पडत असत. त्यांच्यांत प्रतिकाराचें सामर्थ्य नव्हतें. त्यांच्या बायकांना मुसलमानांनीं पळवून न्यावें, त्यांच्यावर बलात्कार करावा, हिंदूंना बाटवावें, गोवध करावा, हिंदूंची कत्तल करावी, मंदिरें फोडावी, हिंदूचे प्राण कवडीमोल, अशा प्रकारें दक्षिणेंत हिंदूंचा अनन्वित छळ चालला होता. या अशा परिस्थितींत शिवाजीचा जन्म झाला. त्याला या गोष्टीची अत्यंत चीड येत असे. त्याला हिंदू समाजाची व धर्माची विटंबना सहन होईना.

## हिंदवी स्वराज्याची शपथ.

निजामशाही, अदिलशाही, कुतुबशाही या बहामनी राज्यांकरितां स्वतःच्या रक्तपातानिशीं हाडाचीं काडें करूनही शहाजीसारख्या प्रबल व बलाढ्य सरदारांचे व त्यांच्या आप्तइष्टाचे जीव सुरक्षित नव्हतें. खेळोजी भोसल्याचा औरंगजेबानें निष्कारण वध केला. जिजाबाईच्या पित्यास व बंधूस निजामशहानें ठार केलें. नामांकित सरदारांची ही वस्तुस्थिति! मग दीन दुबळ्या हिंदू प्रजेच्या दैनावस्थेची कल्पना करणें सुद्धां अशक्य! त्यांत बालपणीं हा शहाजीचा बाणेदार बालक विजापूर दरबारीं गेला असतां त्यानें हिंदूंची बेअब्रू व गोवध हीं प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिल्यामुळें मुसलमानी पातशहाला

त्याचे हातून मुजरा करण्याचें पाप घडवेना! त्यानें पाहिलें कीं, हिंदूंना अब्रूचें जिणें अशक्यप्राय झालें असून प्रत्येक दरबारी सरदार हिंदू समाजाच्या केविलवाण्या वस्तुस्थितिकडे दुर्लक्ष करून आपला स्वार्थ व घराणें सजवीत बसला आहे. याच समयीं शिवाजीचा सासरा मुधोजी निंबाळकर मारला जाऊन त्याचा मेहुणा बजाजी निंबाळकर यास मुसलमानी धर्म स्वीकारणें भाग पडलें. या लहान वयांत शिवाजीच्या अष्टपैलू मेंदूनें ताडिलें कीं हिंदवी स्वराज्य अगर हिंदूचें राज्य स्थापिल्याशिवाय या दुःखप्रद स्थितीचा अंत होणे शक्य नाहीं; व स्वराज्यस्थापनेच्या उपक्रमादाखल शिवाजीनें रोहिडखोऱ्यांतील रोहिडेश्वरासमक्ष आपल्या सवंगड्यांसह हिंदवी स्वराज्य स्थापिण्याच्या निश्चयाचा शपथविधी घडवून आणिला; त्यावेळीं शिवाजीचें वय १३–१४ वर्षांचे असावें. परंतु शिवबाच्या हृदयोद्यानांत स्वातंत्र्याचा अंकुर यापूर्वी ३।४ वर्षें उत्पन्न झाला होता, हें त्यानें इ. स. १६३८–१६३९ च्या सुमारास म्हणजे वयाच्या आठव्या नवव्या वर्षी धारण केलेल्या मुद्रिकेवरून स्पष्ट होतें. शिवाजीच्या मुद्रेवर खालील श्लोक आहे.

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शहासूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय कल्पते ॥

अखेर शिवाजीनें औरंगजेब, अदिलशहा, कुतुबशहा, पोर्तुगीज, सीद्दी व इंग्रज या षड्–शत्रींशी आपल्या चिमुकल्या आयुष्यांत प्रचंड झुंज देऊन हिंदवी स्वराज्याचा संकल्प तडीस नेला.

## हिंदूचें राष्ट्रीकरण

स्वराज्य–स्थापना हें शिवाजीच्या अवतारकार्याचें बाह्य व

मूर्त स्वरूप झालें. पण शिवाजीच्या कार्याचें खरें व महत्तर स्वरूप हें कीं त्यानें मानसिक दौर्बल्यामुळें चहूंकडे पंगळलेल्या हिंदूंत आत्मविश्वास व राष्ट्रप्रेम अगदीं पहिल्या प्रथम उत्पन्न करून त्यांच्या हृदयांत स्वातंत्र्याची ज्योत पाजळली; व याप्रमाणें हिंदूंचे अंतर पालटून त्यांचें एक प्रचंड व बलाढ्य राष्ट्र बनविलें. हीच त्या थोर पुरुषाची पुढील पिढ्यांना उत्तमोत्तम देणगी होय! त्याच्या कृतीनें जगाच्या निदर्शनास आलें कीं, हिंदूंना राज्याच्या उलाढाली, राजकारणें करतां येतात; हिंदू मुत्सद्देगिरी व कारस्थानें यांतहि तरबेज आहेत, हिंदूंना पद्धतशीर लष्कर व पाश्चात्यांशीं बरोबरीच्या नात्यानें झुंझणारीं आरमारेंहि निर्माण करतां येतात. राज्यें काय तीं क्षत्रियांनीं अगर मुसलमानांनीं करावीं, अशा प्रकारच्या लोकांच्या मनांत धरणें धरून बसलेल्या सर्व भावनांचें शिवाजीनें समूळ उच्चाटन केलें व राष्ट्रकार्यें ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्वांनीं केलीं पाहिजेत, असा नवीन समज लोकांच्या मनांत निर्माण करून हिंदूंत चैतन्यपूर्ण नवजीवन आणिलें. अशा प्रकारचें नवचैतन्य हिंदी समाजांत प्रस्तुत कालीं गांधीजी निर्माण करीत आहेत. इ. स. १६२७ पूर्वींच्या हिंदू समाजांत व इ. स. १९२० पूर्वीचे हिंदी समाजांत पुष्कळ प्रकारचें साम्य आढळून येतें. म्हणून शिवाजी व शिवकाल हीं सध्यां अत्यंत मार्गदर्शक होतात. असो, शिवाजीच्या कार्यामुळें उत्तरेंत छत्रसाल या राजपुत्रास स्वतंत्र स्फूर्ति होऊन तो आपल्या पत्नीसह भीमेच्या काठीं शिवाजीच्या भेटीस आला, व शिवाजीचा आशिर्वाद घेऊन बुंदेलखंडांत परत गेल्यावर, हिंदूंचें स्वतंत्र राज्य निर्माण करता झाला, हे येथें सांगणें अप्रस्तुत होणार नाहीं.

* * *

२

# भोसले घराण्याची पूर्वपीठिका. *

अशा प्रकारचें महत्कार्य शिवाजीच्या हातून होण्यास शिवाजीच्या अंगी कोणते लोकोत्तर गुण होते व ते तदंगभूत होण्यास तत्कालीन परिस्थिति व त्याच्या घराण्याचा पूर्वेतिहास हीं कशीं कारणीभूत झालीं यांचें यापुढें विवेचन करणें अवश्य आहे. तत्कालीन परिस्थितीचें वर्णन वर आलेंच आहे. आतां त्याच्या घराण्याची पूर्वपीठिका देऊन त्याच्या अंगच्या गुणांचें वर्णन करणें जरूर आहे.

भोसल्यांची उत्पत्ती चितोडच्या रजपूत क्षत्रिय वंशापासून झाली. चितोडचा राणा लक्ष्मणसिंह हा या घराण्याचा मूळ पुरुष. पुष्कळ मराठ्यांची घराणीं उत्तरेंतून आलीं, तसेंच भोसल्यांचेंही घराणें आलें असावें. भोसाजी नांवाच्या पुरुषावरून त्या वंशास भोसले असें नांव मिळालें. या भोसाजीचा एक मुलगा नेपाळ वंशाचा संस्थापक असून दुसरा देवराजजी या नांवाचा मुलगा इ. स. १४१५ च्या सुमारास दक्षिणेंत आला. याच्या नंतरच्या अकराव्या पिढींत शिवाजीचा आजा मालोजी हा अवतीर्ण झाला. मालोजी हा करारी

* वंशावळ परिशिष्ट पहा.

व दृढनिश्चयी होता, हें सर्वांस विदित आहेच. मालोजी हा आरंभीं लखूजी जाधवरावाच्या पदरीं बारगीर होता जिजाबाईचा बाप लखूजी जाधवराव यानें रंगपंचमीच्या दिवशीं शहाजी व जिजाई हीं एकमेकांच्या अंगावर रंग उडवीत असतां हा जोडा चांगला शोभतो असे विनोदानें ह्मटलें. त्या गोष्टीच्या आधारेंकरून मालोजीनें आपलें वजन निजामशाहीच्या दरबारांत वाढविलें, व निजामशहाकडून लखूजीस शह आणवून आपली मुलगी शहाजीस देणें भाग पाडलें. हा मालोजीचा करारी आणि दृढनिश्चयी स्वभाव शिवाजींत तंतोतंत उतरला होता. मालोजीचा मुलगा शहाजी यानें तर निजामशाहींत सतत दहा वर्षे राज्याच्या घडामोडी करून किंग मेकर [नृपनिर्माता] अशी संज्ञा प्राप्त करून घेतली, व निजामशाहीच्या संरक्षणार्थ मोंगल बादशहा शहाजहान याजशी सारखी दहा वर्षे टक्कर देऊन मराठ्यांचा पराक्रम व चिकाटी हीं पहिल्या प्रथम जगाच्या निदर्शनास आणून दिलीं.

## शिवाजीचा जन्म.

मोंगलातर्फे शहाजीचा सासरा लखूजी जाधवराव हा शहाजीचा पाठलाग करीत असतां आपली गरोदर पत्नी जिजाबाई इजला घोड्यावरून धावपळ करवेना, ह्मणून जुन्नरला सोडून शहाजी फलटणकडे गेला. यावेळीं मानी जिजाबाईच्या मनांत आपल्या पतीची व पित्याची परराज्यार्थ चाललेली धडपड व खटाटोप हीं अवलोकन करून तिटकारा आला असला पाहिजे व याचवेळीं स्वातंत्र्याचे अंकूर तिच्या हृदयांत उद्भवून त्यांचा परिणाम गर्भरूपी शिवरायावर

नि. नं. ८२७
ता. १-११-१२१३५
डा. गो.



झाला असावा, असा तर्क बांधिल्यास तो वावगा असें ह्मणतां येणार नाहीं. पुढें जिजाबाई आपल्या पित्यास सांपडली. पण ती प्रसूतीकरतां माहेरी गेली नाहीं. जाधवरावानें तिला शिवनेरी किल्यावर पोंचविलें. तेथें ती प्रसूत होऊन मुलगा झाला. तोच शिवाजी होय. अशाच परिस्थितींत भक्त शिरोमणी प्रल्हाद जन्मास आला; व गर्भातच भगवद्भक्तीचे संस्कार त्याच्यावर झाले, असें पुराणांतरी कथन केलें आहे. अकबराचाही जन्म अशाच परिस्थितींत ह्मणजे हुमायून धांवपळ करीत असतां उमरकोटच्या किल्यांत झाला, हें इतिहासप्रसिद्ध आहेच. असो. शहाजीचा धाडशी व कारस्थानी स्वभाव व जिजाबाईचें स्वधर्मप्रेम व स्वातंत्र्यप्रीती हीं शिवाजींत उतरलेलीं स्पष्टपणें दिसून येतात. शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ या उक्तीची संपूर्ण सत्यता शिवाजीचे बाबतींत चांगलीच प्रत्ययास येते.

## बालपणचें सुंदर वातावरण.

शिवाजीला बालपणचें धार्मिक, सांस्कृतिक व स्वातंत्र्यप्रीतीचें वळण मुख्यतः त्याच्या आईकडून मिळालें. तिनें मागील पूर्वजांच्या शौर्याच्या, वैभवाच्या व कारस्थानाच्या गोष्टी सांगून शिवाजीच्या कोवळ्या मनांत मोठी हिंमतीची कृत्यें करण्याचा हुरूप आणिला; तसेंच राजकीय व्यवहाराची व तत्कालीन स्थितीचीहि तिनें त्यास माहिती करून दिली. आईच्या सहवासांत त्यास रामायणमहाभारतादि कथापुराणें ऐकण्याचा नाद लागला. संसारांतल्या व व्यवहारांतल्या हरएक प्रसंगीं उपयोगी पडणाऱ्या उत्कृष्ट कथा व नीतिबोध हीं या दोन राष्ट्रीय महाग्रंथांत सर्वत्र भरलेलीं आहेत. त्यापासून व्यावहारिक

शहाणपण व जोरदार स्फूर्ति हीं प्राप्त होतात. महाभारतांतील आवेशयुक्त युद्धवर्णनें ऐकून शिवाजीस स्वराज्यस्थापनेची स्फूर्ति झाली असली पाहिजे; व महाभारतांतील नारदनीति, यक्षनीति, विदूरनीति, कणिकनीति, राजधर्म वगैरे श्रवण करून शिवाजीच्या अष्टपैलू मेंदूस अष्टपैलू राजकीय शिक्षण मिळालें असावें. तत्कालीन मर्दुमकीचें शिक्षण, जमीन महसूल व हिशोब, लष्कर जमवून स्वतःचा व देशाचा बचाव करण्याची आणि लोकांना संतुष्ट ठेवण्याची युक्ति, या गोष्टी दादाजी कोंडदेव यानें शिवाजीस समजावून दिल्या; तसेंच भारत, भागवत इत्यादि ग्रंथ त्यानें शिवाजीस ऐकवून, त्यांतील युद्धकथा नीति व धर्मांची उदात्त तत्त्वें त्याच्या मनावर बिंबविली. दादाजीचें वर्तन अत्यंत पवित्र व पापभीरु असल्यामुळें, त्याच्या समागमानें शिवाजीचें मन व बुद्धि हीं सुसंस्कृत झाली. याप्रकारें आई जिजाई व दादाजी कोंडदेव या उभयतांच्या सुंदर वातावरणांत शिवाजीला बालपणीं अष्टपैलू वळण लागलें.

## शिवाजीची सद्गुणजंत्री.

शिवाजीचा जन्म कोणत्या परिस्थितींत झाला, त्याच्या घराण्याची पूर्वपिठिका किती उदात्त होती, भोसले घराण्यांतील स्वाभिमानी स्वतंत्र बाणा, करारी व दृढनिश्चयी स्वभाव, अंगिकृत कार्यांत दिसून येणारी चिकाटी, साहस व पराक्रम व जिजाबाईची स्वाभिमानी व महत्वाकांक्षी वृत्ति हीं सर्व शिवाजींत कशीं उतरलीं होतीं, व शिवाजीचें बालपण किती उदात्त वातावरणांत गेल्यामुळें त्याला कसें सर्वांगीण वळण लागलें याचे वर विस्तृत विवेचन केलें.

आतां उपरिनिर्दिष्ट अनुवंशिक गुण शिवाजींत कसे पूर्णत्वाप्रत पोंचले होते व या अनुवंशिक गुणांव्यतिरिक्त आणखी कोणते विशिष्ट गुण शिवाजींत चमकत होते हें दाखविलें ह्मणजे या सद्गुणसमुच्चयाच्या जोरावर शिवाजीला आपलें अवतारकार्य कोणत्याहि विकट परिस्थितींतून किती सुलभ रीतीनें उरकतां आले हें स्पष्ट होऊन सांप्रत ज्याला राष्ट्रकार्य करावयाचें आहे त्याला ही शिवाजीची सद्गुण-जंत्री अत्यंत उपयोगी पडल्याशिवाय राहणार नाहीं. राजकारणी पुरुषाला जरूर असणारा अमुक एक गुण शिवाजींत नव्हता किंवा राजकारण-विघातक असा अमुक एक दोष शिवाजींत होता असें कोणीहि इतिहासकार सांगत नाहीं. अगर कोणत्या एखाद्या गुणाचा अतिरेक त्याच्यामध्यें होता, असेंहि दिसून येत नाहीं. सर्व गुण योग्य प्रमाणांत असून त्यांनीं सुवर्णमध्य चांगला साधला होता.

## सर्वगामी अष्टपैलू बुद्धिमत्ता.

शिवाजीच्या बुद्धीची तडफ कांहीं विलक्षण होती. तिची कल्पनाशक्तीहि दांडगी असून तिच्यांत विधायक व विध्वंसक असें दोन्ही प्रकारचें सामर्थ्य होतें. त्याच्या बुद्धिमतेची समयसूचकता तर अद्भुत असे. होता होईल तो रक्तपात टाळून युक्तिप्रयुक्तीनें तो लढाया जिंकीत असे. हल्लींच्या युद्धपद्धतीप्रमाणेंच हव्या तसल्या हुलकावण्या उठवून शत्रूला बेसावध ठेवण्यांत त्याचा हातखंडा होता. त्याच्या अकलेची तारीफ करण्याजोगी ठळक उदाहरणें ह्मणजे आग्र्यांतून सुटका, अफझुलखानाचा वध, शहाजीची मुक्तता, शाहिस्तेखानावर छापा, मोंगली सैन्याची फसवणूक व सुरतेचें नाक दाबून पुण्याचे तोंड उघडणें हीं होत. यापैकीं पहिली तीन जगजाहीर

आहेतच. इतराविषयीं थोडीशीं उद्बोधक माहिती देणें अवश्य वाटल्यावरून खालीं देत आहों.

## शिवाजीची कल्पकता व शा. खानाची दुर्दशा.

पुण्यांत स्वतः शाहिस्तेखान शिवाजीच्या वाड्यांत राहत होता. नजीकच सिंहगडावर शिवाजी होता. मराठ्यांनीं कपटानें घात करूं नये, ह्मणून खानानें आपला बंदोबस्त विशेष काळजीनें केला होता. पुणें शहराची नाकेबंदी केली असून कोणाहि हत्यारबंद मराठ्यास परवानगीशिवाय शहरांत येण्याची मनाई होती. अशा प्रसंगीं शिवाजीनें चमत्कारिक युक्ति योजिली, तिजवरून त्याचें साहस व कल्पक बुद्धि हीं व्यक्त होतात. दोन ब्राह्मण शहरांत पाठवून खानाच्या व्यवस्थेची बारीक खबर त्यानें आणविली; आणि त्यांजकरवीं मोंगल फौजेंतील एका मराठी शिलेदाराशीं संधान बांधून लग्न समारंभाकरितां ह्मणून कित्येक मंडळीसह वाद्यें वाजवित शहरांतून मिरविण्याचा परवाना खानाकडून मिळविला. रात्रीं समारंभानें निघणाऱ्या वरातीबरोबर आपण शहरांत प्रवेश करण्याचा विचार ठरवून शिवाजीनें सिंहगडच्या वाटेनें ठिकठिकाणीं हजार पांचशें लोक ठेविले. कात्रजच्या घाटानें जागजागीं झाडांस व बैलांचे शिंगास पोत बांधविले, आणि इशारतीचा करणा सिंहगडचे वाटेस वाजतांच ते पेटवून द्यावे, ह्मणजे खान व त्याची फौज कात्रजकडे जाईल, अशी तजवीज ठेविली. स्वतः शिवाजी अंगांत मजबुतीचा पोशाख घालून येसाजी कंक, तानाजी मालुसरे व दुसरे पंचवीस लोक, यांसह रात्र पडतांच वरातीच्या मेळ्यांत जाऊन मिसळला. नंतर रात्रीं शिवाजीची मंडळी वाड्यास भोंक पाडून आंत शिरली.

जनानखान्यांतील बायकांनीं चकित होऊन गोंधळ केला. खानाचा मुलगा तलवार घेऊन धांवला, व तो कापला गेला. इतक्यांत खान भाला घेऊन उभा राहिला. त्याच्या अंगावर कांहीं लोक धांवून गेले; तेव्हां त्यानें एकाचे डोकें उडविलें; त्याबरोबर दुसऱ्यानें त्याच्या हातावर वार केला; त्याने खानाची बोटें तुटून हातचा भाला सुटून खालीं पडला. इकडे खान मेला, अशा बायकांच्या आरोळ्या ऐकून आपलें काम झालेंसे वाटून शिवाजीचे लोक मागे परतले; कांहीं पहारेकऱ्यांस त्यानीं कापिलें. शिवाजीहि बाहेर पडून बरोबरची सर्व मंडळी जमवीत सिंहगडास आला. रस्त्यानें कर्णा वाजवितांच संकेताप्रमाणें कात्रजच्या रस्त्याकडे दिवट्या पेटल्या, तेंव्हां शिवाजी तिकडे गेला, असें समजून खानाची फौज कात्रजच्या रस्त्यानें पाठलागास गेली; ह्मणून शिवाजीस लढण्याचा प्रसंगच आला नाहीं.

## सुरतेवर छापा व पुण्याच्या मगरमिठीची सुटका.

शाइस्तेखानास चकित करून मोंगल सैन्यास फसवून शिवाजी स्वस्थ बसला नाहीं. कारण शत्रूचा पुरा मोड करून त्यांना नामोहरम केल्याशिवाय स्वस्थ बसणें हें शिवाजीचें ब्रीदच नव्हे ! मोंगल सुभेदार ४।५ वर्षें आपल्या पुण्यांतल्या वाड्यांत सारखा तळ देऊन बसले होते. त्यांची तेथून मगरमिठी सोडविण्यासाठीं शिवाजीनें सुरत शहर लुटण्याची जी एक अजब युक्ती काढली,त्याबद्दल त्याच्या युद्धकौशल्याची इतिहास सदैव तारीफच करीत राहील. बहीरजी नाईक ह्मणून शिवाजीचे नोकरींत एक पटाईत गुप्त हेर होता. त्यानें सुरतेविषयीं खडान् खडा हकीकत शिवाजीस आणून दिली. सुरत हें त्यावेळचे श्रीमान् शहर, मोंगलाईतील पश्चिम किनाऱ्यावरचे नाकें व

व्यापाराच्या प्रचंड घडामोडीचें ठिकाण होतें. त्यावर हल्ला केला ह्मणजे पुण्याची मिठी सुटेल अशी योग्य युक्ती योजून सुरतेवर छापा घालण्याचा शिवाजीनें विचार ठरविला. नाशिकच्या बाजूस कांहीं निकडीचें काम काढून शिवाजी मोठ्या झपाट्यानें नाशिकास गेला; आणि तेथेंच मुक्काम आहे, असें भासवून चार हजार घोडेस्वारानिशीं ५ जानेवारी सन १६६४ रोजीं एकदम सुरत शहरावर येउन थडकला; व मोंगल फौजेस दाद लागण्यापूर्वी प्राचीन काळापासून संपत्तीचे माहेरघर, असें तें शहर सहा दिवसपर्यंत लुटून तेथील सर्व द्रव्य रायगडास नेऊन पोचविलें. मुसलमानांच्या फौजा त्याजवर आल्या, त्यांचा त्यानें पाडाव केला. या गोष्टी ऐकून औरंगजेब चकित झाला व आपण एकापेक्षां एक बलाढ्य असे सरदार पाठवितो काय व शिवाजी त्या सर्वांच्या हातावर तुरी देऊन आपली धनाढ्य शहरे लुटतो काय, याचा त्याला अचंबा वाटला. याचा परिणाम असा झाला कीं, त्यानें शाइस्तेखानादि सरदारांना परत बोलाविलें व याप्रकारें ४।५ वर्षें पुणें धरून बसलेली मगरमिठी सुटली. असो, या उपरिनिर्दिष्ट दाखल्यावरून शिवाजीमध्यें

## अप्रतिम धाडस

होतें हेंहि येथें स्पष्ट होतें. तो राष्ट्रकार्यांत स्वतःच्या अमोलिक जिवाची पर्वा न करतां केव्हांहि पहिल्या प्रथम उडी घालीत असे. अनुयायांना पुढें लोटून स्वतः अंगचोरपणा केल्याचें एकहि उदाहरण शिवाजीसंबंधाचें कोणाच्याहि आढळांत नाहीं. ह्मणूनच त्याच्या अनुयायांमध्यें धाडसी कृत्यें अंगावर घेण्यांत व पराक्रम गाजविण्यांत अहमहमिका नेहेमीच चालत असलेली दिसून येत असे.

* * *

ता. ........
आ. नं.

३

# शिवाजीची विधायक बुद्धिमत्ता.

शिवाजीच्या विध्वंसक बुद्धिमत्तेविषयीं ह्मणजे अप्रतीम युद्धकौशल्याविषयीं वर विवेचन आलेंच आहे. आतां त्याची विधायक बुद्धिमत्ता ( Constructive genius ) किती वाखाणण्यासारखी होती, याचें थोडेसें ज्ञान वाचकांना करून देणें आमचें कर्तव्य आहे. त्याच्या विधायक बुद्धिमत्तेचें खरें स्वरूप त्याच्या अपूर्व राज्यपद्धतींत स्पष्टपणें दिसून येते. त्याच्या राज्यपद्धतीचें मुख्य अंग ह्मणजे अष्टप्रधानमंडळ. हें शिवाजीचें मंडळ व ब्रिटिश मंत्रिमंडळ किंवा हिंदुस्थान सरकारचें कार्यकारी मंडळ यांत पुष्काळांशीं साम्य दिसून येतें. ही अष्टप्रधान–राज्यपद्धति शिवाजीनें स्वतंत्ररीत्या आपल्या अलौकिक बुद्धिसामर्थ्यानें निर्माण केली होती. त्याकाळीं अगर पूर्वी त्याच्यापुढें कोणतेंहि अनुकरणीय उदाहरण नव्हतें. त्यावेळीं अकबर, शहाजहान या दोनच कारकिर्दी नांवाजलेल्या होत्या. यांच्या बादशाहीचें स्वरूप बहुतेक लष्करी बाण्याचें होतें, ह्मणजे केवळ लष्करी जोरावर देश जिंकून त्याचें संरक्षण करावयाचें, या पलिकडे राज्यव्यवस्थेची मजल फारशी गेली नाहीं. या प्रधानमंडळाची स्थापना करण्यांत शिवाजीच्या मनाचें औदार्य दिसून येतें. राजानें स्वतःच्या अधिकारापैकीं कांहीं विशिष्ट अधिकार प्रधानमंडळास दिल्यानंतर राजाची सत्ता थोडक्या प्रमाणांत कां होईना

अवश्य कमी होते व त्यांच्या अनियंत्रित वर्तनावर प्रधानमंडळाच्या एकजुटीचा थोडासा तरी दाब पडल्याशिवाय राहत नाहीं.

## शिवाजीला स्वार्थ ठाऊक नव्हता.

आपल्या पेशव्यानें आपणापेक्षां दसपट पराक्रमी व्हावें, व तोच कित्ता इतरांनी गिरवावा हें त्याला प्रिय वाटे. जितके आपले कामगार पराक्रमी तितकें आपलें राज्य जास्त मजबूत असें त्यांस सदैव वाटे. इतका निःस्वार्थ उत्तर मराठेशाहींत आपल्याला आढळून येत नाहीं. ह्मणून पुढील राज्यपद्धति इंग्रजांच्या शिस्तीपुढें कमकुवत ठरली गेली. असो, शिवाजीच्या विधायक बुद्धिमत्तेविषयीं जदुनाथ सरकार तारीफ करतात कीं:—

'शिवाजीनंतर त्याच्यासारखा पुरुष अद्यापि निर्माण न झाल्यानें मी तर त्याला हिंदूंतील विधायक बुद्धिमत्तेचा व राष्ट्रोद्धारक असा शेवटलाच महात्मा समजतों. त्याची राज्यपद्धति त्यानेंच स्वतः निर्माण केलेली अशी होती. रणजितसिंगाप्रमाणें त्यानें परकीयाचें अनुकरण केलें नव्हतें, व मदतहि घेतली नव्हती. त्याचे सेनापतिहि फ्रेंच वगैरे परकीय नसून मराठेच होते व त्यांनींच त्याची मावळी सेना तयार केली होती. त्यानें ज्याची उभारणी केली तें दीर्घकालपर्यंत टिकलें. शंभर वर्षांनंतर ह्मणजे पेशव्यांच्या भरभराटींत सुद्धां शिवकालीन संस्थांकडेच प्रशंसापूर्वक व विजिगिषा बुद्धीनेंच पहात असत.'

शिवाजीनें कामाचे आठ विभाग ह्मणजे खातीं करून तीं

अनुक्रमें आठ जणाजवळ सोंपवून दिली होती. यांतच त्याचें विशिष्ट कसब आहे. सांप्रतच्या ब्रिटिश राजवटींत हीच वस्तुस्थिति दिसून येते. याच अष्टप्रधान मंडळानें संभाजीच्या वधानंतर औरंगजेबाच्या तडाख्यांतून मराठेशाहीचें रक्षण केलें. या अष्टप्रधानांना १०००० होनापासून १५००० होनापर्यंत सालीना वेतन नेमून दिलेलें असे. हें वेतन ह्मणजे प्रत्येक प्रधानाला दरमहा चार पांच हजार रुपये पगार पडत असे. वेतन भरपूर दिल्यापासून राज्यकाभारांत शुद्धि राहते हें शिवाजी जाणून होता.

## जहागिरीविरुद्ध शिवाजीचा कटाक्ष.

शिवाजीनें कोणालाच जहागिरी तोडून दिल्या नाहींत. होत्या त्या जहागिरी त्यानें नष्ट करून टाकिल्या. जहागिरी तोडून दिल्यामुळें स्वराज्यप्रेम जाऊन त्या ठिकाणी जहागिरीवरील आसक्ति येऊन बसणार, हें दूरदर्शी शिवाजीच्या चटकन् लक्षांत आल्याशिवाय कसें राहील? ह्मणून शिवाजी आपल्या सर्व कामगारांना नक्त वेतन देत असे. उत्तर मराठेशाहींत ही वस्तुस्थिती राहिली नाहीं व उत्तरोत्तर जहागिरीची हाव बळावत चालली, व मराठी राज्याचें शतशः खंड पडत चालले. यामुळें तर इंग्रजांना चांगलेंच फावलें. शिवाजी नोकरी वंशपरंपरेनें न देतां लायक इसमास देत असे. त्यानें आपले प्रधान पुष्कळ वेळां बदलले.

## शिवाजीची मुलकी व्यवस्था.

रयतेस सुख देऊन आपलें उत्पन्न कसें वाढवावें ह्याचें शिक्षण

शिवाजीस दादाजी कोंडदेवापासून मिळालें. मुख्य प्रधान मंडळांतील पंतअमात्य व पंतसचीव या दोन प्रधानाकडे राज्यांतील जमीन-महसूल संबंधी सर्व व्यवस्था असे. पूर्वी जमिनीचा वसूल उत्पन्न झालेल्या धान्यानें भागविण्यांत येई, व तो जमीनदार अगर धारेकरी यांचे मार्फत सरकारांत भरला जाई. शिवाजीनें हे दोन्ही प्रकार बंद केले.

## रयतेशीं प्रत्यक्ष संबंध.

जमिनीची मोजणी करून तिचा सारा एकदां कायमचा ठरवून देण्यांत आला, व तो वसूल करण्याकरितां शिवाजीनें कमाविसदार महालकरी असे स्वतंत्र पगारी अंमलदार नेमिले. यापूर्वी जमिनदार फाजील वसूल घेऊन सरकारांत तो सर्व भरीत नसत. यामुळें ते मस्त होऊन रयतेस पिळून काढीत, व सरकारास जुमानीत नसत. जमिनीची मोजणी करून ती खातेदाराच्या नांवावर चढवावयाची, व खातेदाराकडून कबुलायत लिहून घेऊन ती त्याचे हवाली करावयाची, असा प्रघात शिवाजीनें घातला. सारा ठरवितांना उत्पन्नाचे $\frac{२}{५}$ पेक्षां जास्त वसूल केव्हांहि घेऊं नये, अशी शिस्त होती. आपत्कालीं लोकांस तगाई, वगैरेची मदत देऊन सरकारी घेणें हप्त्याहप्त्यानें ४।५ वर्षांनीं वसूल करण्यांत येई. स्वराज्य लूट, खंडणी, दरोडे, वगैरेचा उपद्रव रयतेस साहसा होत नसे. तेथील रयतेवर जमिनीच्या साऱ्याशिवाय दुसरा कोणताहि कर नव्हता. पाऊस पडला नाहीं तर पुढील वसुलाची माफी आगाऊ देत असत. मुलकी व्यवस्थेंत लष्करी अंमलदारास कांहींच अधिकार नव्हता!

प्रत्येक गांवास एक पाटील व कुळकर्णी; त्यांवर एक कमाविसदार; कमाविसदारावर तालुकदार किंवा महालकरी; तालुकदारावरचा अधिकारी सुभेदार. देशपांडे वगैरे पिढीजाद लोकांकडे कांहींच अधिकार शिवाजीनें ठेविलेला नव्हता. सर्वांस त्यांचे कामगिरीबद्दल दरमहाचे दरमहा रोख वेतन सरकारी खजिन्यांतून देण्यांत येई. देशपांडे, देशमूख वगैरे पिढीजाद नोकरांससुद्धां आपले हक्क रयतेपासून परभारें वसूल करण्याची सक्त मनाई होती. यावरून शिवाजीचें धोरण हल्लींच्या सरकारच्या धोरणाशीं किती जुळतें आहे, हे अगदींच स्पष्ट होते. फरक एवढाच कीं, सांप्रतच्या सरकारनें ब्रिटिश प्रजेचें व साम्राज्याचें हित उराशीं बाळगिलें आहे. शिवाजी हा स्वप्रजाहितदक्ष होता.

## शिवाजीचें लष्कर.

शिवाजीचें लष्कर दोन प्रकारचें होते; घोडेस्वार व पायदळ. स्वारांहून पायदळाचा भरणा मोठा असे. पायदळाच्या दहा, शंभर, हजार, पांच हजार अशा तुकड्या केलेल्या असत; व प्रत्येकीवर अनुक्रमें नाईक, हवालदार, जुमलेदार, एकहजारी व सरनोबत असे कामगार नेमलेले होते. शिपायास दरमहा १०।१२ रुपये पगार; जुमलेदारास सालीना ४०० रुपये; एकहजारी यांस सालीना २००० रुपये; पंच हजारी यांस सालीना १०००० रुपये, असा पगार असे.

घोडेस्वारांची व्यवस्था बहुतेक पायदळासारखीच होती. परंतु प्रत्येक मराठा अंमलदाराचे हाताखालीं एक ब्राह्मण सबनीस व प्रभु

कारखानीस अशी व्यवस्था होती. शिवाजीजवळ स्वतःचे असे दहा बारा हजार उत्कृष्ट कच्छी व आरबी घोडे नेहमीं तयार असत.

## गुप्त हेरांचे जाळे.

वरच्या सर्व अधिकाऱ्यांबरोबर बातमी आणणारे हेर व लिहिणारे कारकून असत. चहूंकडे हेरांचें जाळें पसरून शत्रूच्या इत्थंभूत हालचालीची बातमी काढण्यांत शिवाजीचा मोठा हातखंडा होता, हे सर्वश्रुत आहेच. बहीरजी नाईक ह्मणून एक मराठा गृहस्थ सर्व हेरावर मुख्य असून, तो आपल्या कामांत अत्यंत वाकबगार असल्यामुळें त्याजवर शिवाजीचा विशेष लोभ होता. एका अंमलदारावर दुसरा अंमलदार असला ह्मणजे त्याजवर दाब राहतो, ह्मणून शिवाजी प्रत्येक खात्यांत अंमलदारावर अंमलदार असे अनेक अंमलदार नेमीत असे. ब्रिटिशांनींही हीच पद्धत स्वीकारिली आहे. हे सर्व अंमलदार आपल्या खात्याच्या प्रधानास जबाबदार असत.

## शिवाजीचें आरमार.

दर्यासारंग इब्राहिमखान व मायनाक भंडारी हे आरमाराचे मुख्य सरदार होते. समुद्रावर जहाजें ठेवून आपली सत्ता वाढविण्याची शिवाजीस अनिवार इच्छा होती. इंग्रज ह्मणत, ‘ तो स्वतः खलाशी नव्हता ह्मणून बरें, नाहीं तर त्यानें जमिनीचा पृष्ठभाग साफ करून टाकिला त्याप्रमाणेंच समुद्राचाहि टाकिला असता. ’ त्याला समुद्रस्नानाची अतिशय आवड असे. त्याचप्रमाणें सिंधुदुर्ग किल्ला बांधण्यांत तो स्वतः खपत होता. त्याचें समुद्रावरील पराक्रम कांहीं

कमी योग्यतेचें नाहींत. त्यानें दाभोळ बंदर व आजूबाजूचीं अनेक ठिकाणें औरंगजेबापासून हिसकावून घेतलीं. पश्चिम किनाऱ्यावर अनेक किल्ले ताब्यांत ठेवून त्यांच्या योगानें समुद्रावर आपला ताबा चालविण्याची तजवीज केली. जंजिराच्या सिद्दीशीं सतत झुंज चालविली. रायरी, मालवण, सुवर्णदुर्ग विजयदुर्ग इत्यादि मजबूत किल्ले बांधून, त्या त्या ठिकाणीं त्यानें आरमार ठेवून दिलें. मुंबई-पासून वीस मैलावर अलीबागचा किल्ला कुलाबा येथें आपल्या आरमाराचें मुख्य ठिकाण करून, येथें दारूगोळ्याची उत्तम तजवीज ठेविली. त्याच्या आरमारांत आरंभी ( १६६५ ) लहान मोठी ८५ जहाजें असून त्यांत ३ मोठ्या डोलकाठ्यांची होती. परंतु पुढें सहा वर्षांत त्याचें आरमारांत १६० जहाजें झालीं. इंग्रजांस आपली शक्ति दाखविण्याकरितां त्यानें हें सर्व आरमार एकदां मुंबईच्या बॅक बे बंदरांत आणिले होते. मरणापूर्वी थोडा वेळ त्यानें कधीं काळीं आपणास इंग्रजांचे आरमार वरचढ होईल या भीतीनें, त्यांजवर दाब ठेवण्याकरितां खांदेरी बेट काबीज करून तेथें मजबूत आरमाराची जागा केली. पुढें प्रसिद्धीस आलेला नामांकित दर्यावर्दी सरदार कान्होजी आंग्रे शिवाजीच्या आरमारांत तयार झालेला होता. याव-रून हें स्पष्टच होतें कीं शिवाजी आणखी १०–२० वर्षे जगता तर पोर्तुगीज, सिद्दी, इंग्रज या सर्वांचे पश्चिम किनाऱ्यावरून उच्चाटन करता ! उत्तर मराठेशाहींत पेशव्यांनीं आरमाराकडे दुर्लक्ष केले, इतकेंच नव्हें तर क्लाइव्ह व वॉटसन यांची मदत घेऊन इंग्रजांना भारी झालेल्या आङ्ग्र्यांचा पुरा मोड केला. म्हणून इंग्रजांचे पश्चिम किनाऱ्यासंबंधीचे आयतेच काम झाले. असो.

शिवाजीनें राज्याच्या चिरस्थायित्वासाठीं अनेक महत्वाच्या तजविजी करून ठेविल्या या तजविजी

## शिवाजीचें दूरदर्शित्व व मुत्सद्देगिरी

यांची साक्ष देतात. वर वर्णिलेली त्याच्या लष्कराची व्यवस्था, किल्ल्यांच्या योगानें राज्य ताब्यांत ठेविण्याची युक्ति, किनारा कह्यांत आणूं शकणारें आरमार व उत्तेजन देण्याची त्याची हातोटी, अष्टप्रधानमंडळादि भक्कम पायावर रचलेली राज्यव्यवस्था या दूरदर्शित्वाच्या व मुत्सद्देगिरीच्या गोष्टीबद्दल त्याची तारीफ करावी तेवढी थोडी आहे.

## शिवाजीचे किल्ले.

शिवाजीचे एकंदर किल्ले जवळ जवळ तीनशे होते. प्रत्येक किल्ला व तन्मर्यादापरिविष्ट प्रदेश हा शिवाजीच्या राज्यमालिकेंतील एक एक मणि होय. या बहुमोल मालिकेनें शिवाजीनें आपलें राज्य एकत्र ग्रंथित केलें. शिवाजीचीं बहुतेक अचाट कृत्यें या किल्ल्यांचे योगानें तडीस गेली. किल्ल्यावर तो पाण्यासारखा पैसा खर्च करी. अनेक आणीबाणीचे प्रसंग शिवाजीवर आले असतां, त्यांतून निभावून जाण्यास हेच किल्ले त्यास उपयोगी पडले. या किल्ल्यांच्या योगानें मराठ्यांच्या तत्कालीन पराक्रमास एक प्रकारची विलक्षण रसाळता आली आहे. सिंहगडानें तानाजीचें नांव आबालवृद्धांच्या तोंडीं आणून दिलें आहे. जिंजीबासानें तर मराठ्यांचा खरा स्वाभिमान कसासच लाविला ! प्रतापगडचें नांव निघाल्याबरोबर शिवा-

जीनें अफझुल खानावर केलेली मात कोणास आठवणार नाहीं ? थर्मापिलीची साम्यता पावलेला खेळणा व तेथें आपले प्राण खर्ची घालून शिवाजीस वांचविणारा बाजीप्रभू यांची आठवण बुजेल काय ? अलीबाग व मालवण येथील जंजिरे शिवाजीच्या आरमाराचें केवळ आदिस्थान होत. शिवाजीच्या जन्मानें शिवनेरीचें नांव इतिहासांत अजरामर झालें आहे. प्रत्यक्ष शिवाजीस ह्या किल्ल्याचें इतकें महत्व वाटत होतें कीं ' किल्ले बहुत झाला, विनाकारण पैसा खर्च होतो ' असे कोणी ह्मटल्यास शिवाजी उत्तरे कीं ' आपणांस धर्मस्थापना व राज्यसंपादन करणें. सर्वांस अन्न लावून, शत्रुप्रवेश न होय, तें किल्ल्यामुळें होतें. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारखा शत्रु उरावर आहे, तो आला तरी नवे जुने तीनशेंसाठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला, तरी तीनशें साठ वर्षें पाहिजेत. ' किल्ल्यावर व्यवस्थाहि उत्कृष्ट असे. प्रत्येक गडावर मराठा हवालदार, ब्राह्मण सबनीस, प्रभु कारखानीस असे. ग्रँटडफ ह्मणतोः—किल्ल्यातून आंत बाहेर कोणी केव्हां जाणें, गस्त फिरणें पहारे चौक्या संभाळणें व त्यांजवर देखरेख ठेवणें पाणी, धान्य-सामुग्री, युद्ध—सामुग्री हत्यार तयार ठेवणें, या गोष्टीविषयीं अगदीं सक्तीचे व सूक्ष्म नियम शिवाजीनें केलेले असून, प्रत्येक शाखेवरील मुख्य अधिकाऱ्यांची बारीक सारीक कामें सुद्धां ठरविलेलीं होतीं. आणि ते नियम मोडण्यास तिळभर जागा नव्हती. इतकें असूनही त्याचा या सर्व बाबींचा खर्च काटकसरीनें बांधिलेला होता. शिवाजी सर्व किल्ल्यांची स्वतः तपासणी करीत असे.

* * *

## ४
# स्वराज्याची मजबूत संघटना.

स्वराज्य मिळविण्यास आरंभ केल्यापासून शिवाजी जो जो प्रदेश काबीज करी, तेथें वर नमूद केल्याप्रमाणें मुलकी, लष्करी वगैरे सर्वतऱ्हेनें उत्कृष्ट व्यवस्था स्थापन करीत असे. त्यानें आपल्या स्वराज्याची १२ प्रांतांत विभागणी करून त्यांतही पोट–विभाग करून, प्रत्येक विभागावर अंमलदार, अंमलदारावर अंमलदार अशी उत्कृष्ट योजना केली होती. स्वराज्याचा प्रत्येक भाग सुसंघटित केलेला होता म्हणून शिवाजीला पुष्कळ राज्य मिळवितां आलें नाहीं. इंग्रजांनींसुद्धां हीच पद्धति स्वीकारली म्हणून त्यांना हिंदुस्थान मिळविण्यास २०० वर्षें लागलीं. याला संघटना ( Consolidation ) म्हणतात. उत्तर मराठेशाहींत मराठ्यांनीं ही पद्धत अंगिकारिली नाहीं. म्हणून त्यांनीं नवीन प्रदेश मिळविला तरी, लगेच परत शत्रूंना तो प्रदेश काबीज करितां येत असे. शिवाजीच्या राज्यव्यवस्थेसंबंधीं माहिती घेत असतां क्षणोक्षणीं इंग्रजांच्या राज्यपद्धतीची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. जी पद्धती इंग्रजांना नूतन पाश्चात्य शास्त्रांच्या आधारें, शेंकडों कमिशनें बसवून हजारों लोकांच्या अनुभवांनीं बसवितां आली, तीच शिवाजीनें पुस्तकी विद्या किंवा आजूबाजूला कोणतींहि अनुकरणीय उदाहरणें नसतांनासुद्धां मागसलेल्या काळांत केवळ अचाट बुद्धिमत्तेच्या सहाय्यानें

ता.



प्रचलित केली; त्या बुद्धिमत्तेचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे! न्यायमूर्ति रानडे ह्मणतात कीं ‘ शिवाजीच्या राजकीय तत्वांचा इंग्रजांनीं मुद्दाम पुरस्कार केला ह्मणून ते अल्पसंख्य असूनहि या अफाट देशावर राज्य करितात.’ यांत शिवाजीच्या राजकीय तत्वांचाच विजय आहे. शिवाजीच्या राजकीय धोरणासंबंधाचा न्या. मू. रानड्यांचा अभिप्राय रानड्यांच्या अधिकारयुक्त वाणीनेंच दिलेला बरा; न्यायमूर्ति ह्मणतात:–

‘It will thus be seen that in all the points in which the principles of Government laid down by Shivaji were departed from by his successors, we can trace the causes of the weakness and decline of the Maratha Power, long before it came in conflict with British Authority in India. That Authority, when it obtained supremacy, gave it deliberate preference to the principles laid down by Shivaji over those which found favour with his successors. British Rule in India is carried on the principle of enforcing a complete separation of the civil from the military department and a due subordination of the latter to the former. It insists upon cash payments for services rendered, and declines to make grants of lands by way of assignment for military or other services. It refuses to recognise any heriditary claims to public offices, high or low. The Government is carried on by Boards and Councils, and not by the unfettered discretion of a single ruler, it collects its land revenue by its own paid agents, never farms it out to the zamindars or farmers. It also provides for a due distribution of offices, among all classes of its subjects.

As a consequence of the observance of these maxims of state policy, a handful of Englishmen have been able to govern the whole country in a way that strikes both native and foreign students of its administration as a marvellous feat of statesmanship. The wisdom of Shivaji's principles has been thus vindicated not only by the success which he himself achieved but by the success which has attended the efforts of those who built their power upon the ruins of the confederacy which he had tried to knit together and which broke up, chiefly because Shivaji's successors departed from the line of policy laid down by him for their guidance.*'

---

* **सारांशः**–( शिवाजीनें घालून दिलेल्या सर्व तत्त्वांपासून त्याच्यामागून येणारे राजपुरुष च्युत झाले, यांतच मराठी सत्तेच्या ऱ्हासाचे बीज रुजलें गेलें. मराठ्यांच्या नंतर आलेले ब्रिटीश यांनीसुद्धां आपलें हिंदुस्थानांत वर्चस्व स्थापन केल्यानंतर शिवाजीच्या तत्त्वांचाच पुरस्कार केला. ब्रिटीश राज्यपद्धतींत दिवाणी व लष्करी खात्यांचे पृथक्करण केलेलें असून लष्करी सत्ता ही दिवाणी सत्तेस मान तुकवीत असते.तींत जहागिरी देण्याची चाल नसून नक्त वेतनें देण्याची पद्धत स्वीकारिली गेली आहे. या पद्धतींत अधिकाराच्या जागा वंशपरंपरेनें दिल्या जात नाहींत. समिती व मंडळें यांच्या सहाय्यानें ब्रिटीश राज्यकारभार चालविला जात असून सुलतानशाहीला वाव नाहीं. शिवाजीप्रमाणें ब्रिटीश सरकार आपण नेमिलेल्या अधिकाऱ्यामार्फत सारा वसूल करीत असून सर्व वर्गांशीं समदृष्टि ठेवून सर्व वर्गांत समप्रमाणांत अधिकाराच्या जागा विभागते. या शिवकालीन तत्त्वांचा अवलंब केल्यामुळें मूठभर इंग्रजांना या अफाट देशावर शांततेनें राज्य करतां येत आहे. यांतच शिवाजीच्या तत्त्वांचा खरा विजय होय ! )

## स्वधर्म व स्वातंत्र्य यांसाठीं सारखी तळमळ.

राष्ट्रीय पुढाऱ्यामध्यें अवश्य तीन गुण असावे लागतात. (१) अलौकिक बुद्धिमत्ता (२) अचाट साहस (३) राष्ट्राबद्दल अत्युत्कट तळमळ. यापैकी पहिल्या दोन गुणांचे विस्तृत विवेचन वर केले आहे. तिसरा गुण मनाची तळमळ. हा तर शिवाजींत ओतप्रोत भरला होता. कार्लाईलचे ह्मणणें असें आहे कीं, ज्या व्यक्तींत मनाची तळमळ (Sincerity) नाहीं ती व्यक्ती विभूतीच होऊं शकणार नाहीं. राष्ट्रचिंतन अगर स्वधर्मचिंतन याशिवाय शिवाजीच्या आयुष्यांतला एक क्षणहि गेला नसेल व या तळमळीमुळेंच शिवाजीला आपल्या सर्व आयुष्यामध्यें एक क्षणहि विश्रांती मिळाली नाहीं. या तळमळीचें हस्य ह्मणजे शिवाजीची

## सावधगिरा व उद्यमशीलता.

शिवाजीनें आपलें राज्य फार सावधगिरीनें व हळू हळू वाढवीत नेलें. एक काम पक्के झाल्यावर दुसरें हातांत घेतलें ह्मणून झालेलें काम बिघडलें नाहीं, किंवा एकदम भलत्याच कामास हात घालून त्याच्या जिवाची धांदल उडाली नाहीं. शिवाजीच्या जिवावर किती तरी शत्रू टपून बसले होते. तो जरा जरी बेसावध राहिला असतां, तर तो शत्रूंच्या हातांत, सांपडल्याशिवाय राहाता ना ! मोंगल बादशहा, आदिलशहा, कुतुबशहा, पोर्तुगीज, सिद्दी, इंग्रज या सर्वांशीं सतत तीस वर्षे झुंज देऊन भरतखंडांत अपूर्व असें स्वराज्य शिवाजीनें स्थापन केल्यामुळें त्याच्या आयुष्याची ३५ वर्षे प्रचंड उद्योगांनीं ओतप्रोत भरलीं आहेत हें निराळें सांगावयास नको.

## जनचित्ताकर्षक शक्ती व लोकसंग्रह

( Shivaji's personal magnetism )

ज्या ज्या लोकांशीं शिवाजीचा संबंध येत असे त्या त्या लोकांवर शिवाजी स्वत:ची छाप एकदम बसवीत असे. लोकांची मनें मोहून टाकण्याची कला शिवाजीला उत्कृष्ट साधली होती. औरंगजेबाचे सरदार जयसिंग व जसवंतसिंग यांची मनें त्यानें अल्पावकाशांत आकर्षून घेतलीं. देशांतली उत्तम रत्नें वेचून काढून त्यांना आपल्या भजनीं लाविलें व राष्ट्रकार्यार्थ सर्वस्व अर्पण करण्यास भाग पाडलें. शिवाजी सर्वांशीं प्रसन्नतेनें वागत असे. प्रत्येकांस असें वाटावें कीं, राजाचें मन आपणावर आहे व आपणाशींच तो मनमोकळें करून बोलतो. याप्रकारें सर्वांचीं चित्तें त्यानें आपणाकडे आकर्षून घेतलीं होतीं. हिंदूंचा धर्माभिमान व राष्ट्राभिमान वारंवार जागृत करून त्याजकरवीं तो राष्ट्रकार्य करवून घेत असे. शिवाजीची लोकसंग्रहाची पद्धत खालील प्रमाणें असे:—

( १ ) शिवाजी प्रमुख माणसास हाताशीं धरी, ह्मणजे त्याचे अनुयायी आपोआप त्यास येऊन मिळत. तो प्रमुख माणसाचा धर्माभिमान व राष्ट्राभिमान जागृत करी व त्याच्यांत स्वातंत्र्यप्रीति उत्पन्न करून तो त्यांना वश करीत असे.

( २ ) मसलतीचे वेळीं कोणी कितीं माणसें आणावीं हें ठरवी आणि

( ३ ) शिवछत्रपतीकडे दाद मागण्यास गेले ह्मणजे तो दाद घेतो, असा लोकांत भरंवसा उत्पन्न करी. याप्रकारें त्यानें सर्वत्रांस आपल्या भजनीं लावलें.

## मानवी स्वभाव परीक्षण.

शिवाजीला मानवी स्वभावाचें परीक्षण उत्कृष्ट रीतीनें करितां येत असे. यामुळेंच त्याला सर्वत्र विजय मिळत गेला. तो नानाविध कामगिरीवर योग्य माणसांची योजना करीत असे. तो कोणत्या माणसाची कितपत योग्यता आहे, तें पाहूनच त्याच्या योग्यतेचें काम त्याजवर तो सोंपवीत असे. त्याची सेनापति, मंत्री, मुत्सद्दी, अंमलदार वगैरेची निवडणूक कधींहि चुकीची ठरली नाहीं व त्यांच्या हातूनहि सहसा चुका घडल्या नाहींत.यामुळें त्याचा दिवाणी-लष्करी कारभार अद्वितीय होता, यांत शंका नाहीं. त्याचा कोणीहि नौकर बेइमान झाला नाहीं व त्याचा कोणीही विश्वासघात केला नाहीं.

## समदृष्टि.

शिवाजीचें सर्वांशीं सारखें वर्तन असे. त्याला जातिभेद मुळींच ठाऊक नव्हता. तो ब्राह्मण, प्रभू, मराठे, महार, मुसलमान या सर्वांना समदृष्टीनें वागवीत असे. त्यांच्या सैन्यांत सर्व जातीचे व धर्मांचे लोक असत. सर्व धर्मांना सारख्या सवलती व देणग्या तो देत असे; व सर्व धर्मांचें सारखें संरक्षण करीत असे.

## चौकस बुद्धि.

मागें शिवाजीचे गुप्त हेरांचे जाळें चहूंकडे पसरिलें होतें ह्मणून सांगितलेंच आहे. तो जेथें जेथें जाई तेथें प्रत्येक गोष्टीची बारकाईनें चौकशी करीत असे. त्याला इंग्रज, पोर्तुगीज वगैरे पाश्चात्यांची

जितकी माहिती होती तितकी उत्तर मराठेशाहींत, त्यांच्याशी निकट संबंध येऊनहि, कोणालाहि किंबहुना नाना फडणवीसालाहि नव्हती. तो पाश्चात्यांचा कावेबाजपणा ओळखून होता, ह्मणून त्यानें अव्वल नंबरचें आरमार निर्माण केलें होतें. त्याचा पुढें नानासाहेबानें नाश करून पश्चिम किनाऱ्यावरील रान पाश्चात्यांना मोकळें करून दिलें, हें देशाचें दुर्दैवच ह्मणावयाचें! चौकस बुद्धीचें नमुनेदार उदाहरण ह्मणजे शिवाजी जयसिंगाच्या भेटीस गेल्यावेळीं मोगलांच्या तोफखान्यावरील पोर्तुगीज अंमलदार मनूची याजपासून युरोपांतील राजांविषयीं नानाप्रकारची माहिती शिवाजीनें विचारून घेतली.

## शिवाजीची कडक शिस्त व नियम.

राज्याची जोखीम संभाळणें हें काम मोठें कठीण आहे. त्यास अत्यंत कठोरपणा धारण करावा लागतो, हें शिवाजी पक्कें जाणून होता. शिवाजी भीडमुर्वत सखासोयरा बिलकूल ओळखत नसे. शिस्तींत बिघाड झाल्यास जबरदस्त शिक्षा करी. कित्येक वेळां त्यास हरामखोरांची डोचकीं उडवावीं लागत. सर्व अंमलदार लोक त्यास चळचळां कांपत असत. गांवांत चोरी दरोडा झाल्यास त्याची भरपाई रखवालदारास द्यावी लागे. फौजेचा पगार वेळच्या वेळीं देण्यासंबंधी शिवाजीचा सक्त नियम होता. लष्करांत बटीक, बायको, कलाल वगैरे नेण्यास सक्त मनाई असे. कर्ज काढण्याची मनाई असे. लग्न कार्यादि विशेष प्रसंगीं लोकांस सरकारांतून मदत देण्याची व्यवस्था होती. शिवाजीच्या लुटीच्या नियमासंबंधानें शिवाजीवर निंदाव्यंजक दूषणांची लाखोली वाहणारा खाफीखान ह्मणतो:—शिवाजी पुष्कळ संपत्ति लुटून आणी; परंतु त्याचा असा नियम होता

कीं, मशिदीला व कुराणाला हात लावूं नये, किंवा कोणा बायका पुरुषांची अब्रू घेऊं नये. कुराणाचें पुस्तक लुटींत त्याचे हातीं आल्यास तें तो मोठ्या सन्मानानें आपल्या हाताखालील मुसलमानांस देऊन टाकी. लुटीकरितां कोणीहि इसम पकडलेला असल्यास, मग तो हिंदु असो वा मुसलमान असो, त्याची यथायोग्य काळजी घेण्यांत येऊन त्यास कोणताहि त्रास देण्यांत येत नसे. लुटीसंबंधाचे त्याचे नियम असे सक्त होते कीं, कोणतीहि लूट लोकांनीं पैदा करून आणिली तर ती सरकारांत भरावी लागे.'

*                    *                    *

५

# शिवाजीची लूट ह्मणजे स्वराज्य-भिक्षा.

शिवाजी स्वराज्य स्थापनेकरितां परक्यांच्या ताब्यांतून स्वदेश सोडविण्याचे कामीं अहर्निश खटाटोप करीत असतां त्याला मोंगल बादशहा, अदिलशहा, कुतुबशहा, सीद्दी, पोर्तुगीज व इंग्रज या शक्तींशीं सतत झुंझावें लागलें; किंबहुना त्याचें सर्व आयुष्य ह्मणजे या षड्शक्तींशीं झुंझ हेंच असून तत्प्रित्यर्थ द्रव्य संपादनार्थ त्याला स्वराज्याची झोळी फिरवावी लागली. त्यालाच शत्रू लूट या नांवानें संबोधितात. वर निर्दिष्ट केलेले लुटीचे जे नियम शिवाजीनें घालून दिले व ज्या नियमांची खाफीखानानें तारीफ केली आहे त्यांवरून शिवाजीच्या लुटीला कोणीहि लूट न ह्मणतां ती स्वराज्याची भिक्षा असेंच कोणी ह्मणेल. राज्य स्थापन झाल्यावर

कर बंद करून शिवाजीनें दुसरें कर बसविले हें त्यांच्या उत्तर चरित्रावरून दिसून येतें. टिळक असलीच लूट करीत असत. गांधीहि पण याच प्रकारची लूट करीत आहेत. यांनाहि लोक दूषणें देत असतात. फार झालें तर यांचा नैतिक जुलूम तर शिवाजीचा शारिरिक जुलूम असे ह्मणतां येईल.

## शत्रूंना कमजोर करण्याचें साधन.

शिवाजीच्या लुटीसंबंधानें आणखी एक महत्त्वाचा मुद्दा ध्यानांत ठेवण्याजोगा आहे तो हा कीं शिवाजी लूट करी, ती नेहमी शत्रूच्या मुलुखांत युद्ध चालू असतांना करी. अशाप्रकारची लूट सांप्रतच्या पाश्चात्य युद्धनीतीला मान्य आहे. शत्रुला कमजोर करण्याचें हें एक साधन आहे. त्यांतहि शिवाजी सुरत, जालना, हुबली सारखीं शहरें व तेथील शत्रूंना मदत करणारें धनाढ्य सावकार यांनांच लुटत असे. येथें हेंहि ध्यानांत ठेविण्याजोगे आहे कीं, त्यानें शत्रुच्या मुलुखांतील शेतकरी पेशाची गांवें लुटून रयतेस त्रास दिला नाहीं व शेतें व त्यांतील पीकें उध्वस्त केली नाहींत, किंवा हैदराप्रमाणें खेडींची खेडीं जाळून बेचिराख केली नाहींत. शिवाजीनें राजापूरची इंग्रजांची वखार लुटली, याचें कारण इंग्रज युद्धांत विजापूरकरांना दारूगोळा पुरवीत असत हेंच होय. शिवाय तहाच्या मुदतींत शिवाजी शत्रुंना कधींहि त्रास देत नसे; व तहाचे नियम तंतोतंत पाळण्याची शिवाजी खबरदारी घेत असे. शत्रुंकडून तहाचा भंग झाल्यावर मात्र शिवाजी चढावाचें धोरण स्वीकारी !

## शिवाजी वज्रापेक्षां कठोर व मेणापेक्षां मऊ.

या प्रमाणें शत्रुंना नामोहरम करण्यांत, राज्यकारभारांतील शिस्त

पाळण्यांत शिवाजी कठोर असला तरी इतर बाबतींत आईशीं, गुरुशीं, मुलाशीं, प्रजेशीं, नोकरांशीं, आप्तइष्टांशीं, सखासोयऱ्यांशीं वागतांना अत्यंत दयार्द्र व प्रेमळ अंतःकरणाचा असा आढळून येत असे. तानाजी पडल्यावर शिवाजीला रडूं कोसळलें. आग्र्याच्या किल्ल्यांत कैद झाल्यानंतर आपण जयसिंगाच्या व औरंगजेबाच्या काव्याला फसून स्वदेशाचा व स्वधर्माचा घात केला, असें शिवाजीला वाटून तो धीर गंभीर राजपुरुष संभाजीला पोटाशीं धरून ओक्साबोक्शीं रडूं लागला. आईच्या मरणानंतर त्याला सर्व जग उदास दिसूं लागलें. रामदासाला आपलें राज्य त्यानें अर्पण केलें, हें सर्वत्र मशहूर आहेच. तो गरीबाचा कनवाळू होता. शत्रुमुलखांतील दीनदुबळ्यांना त्यांनीं कधींहि दुःखविलें नाहीं. शत्रुंच्या लोकांस त्यांच्या जखमा बऱ्या करून तो स्वगृहीं पोंचवित असे. एकंदरींत रयतेस पोटच्या मुलाप्रमाणें वागविणारा असल्यामुळें रघुवंशांतील दिलीप राजाप्रमाणें.

## स पिता पितरः तासां केवलं जन्महेतवः

ही पदवी शिवाजीनें प्राप्त करून घेतली शिवाय रक्तपात त्याला मनापासून आवडत नसे. ह्मणून तो आपले सर्व बेत युक्तिप्रयुक्तीनें तडीस नेत असे. एकंदर कार्य त्यानें साभोपचारानें, दयार्द्र अंतःकरणानें व दूरदृष्टीनें पार पाडिलें. लागवड करण्यास आलेल्या रयतास शिवाजी जनावरें व बी विकत घेण्यास द्रव्य देत असे व तें त्यांचेकडून सवडीसवडीनें चार हप्त्यानें वसूल करून घेत असें. वसूल मात्र धान्याच्या रूपानें घेतला जात असे.

## शिवाजीचें औदार्य.

राजपुरुषांस शोभण्यासारखें औदार्य शिवाजींत ओतप्रोत भरलें होतें. अष्टप्रधान मंडळाची उभारणी ही त्याच्या औदार्याचेंच द्योतक आहे, ह्मणून या पूर्वी सांगितले आहेच. सर्वांना भरपूर वेतनें देणें, यासंबंधी वर चांगलाच उहापोह झाला आहे. शिवाय शिवाजी कामगिरी करणारास व पराक्रम गाजविणारास त्याच्या योग्यतेनुसार वारंवार बक्षिसें देऊन अत्यंत खूष ठेवीत असे. हाताखालच्या लोकांवर त्याचा पूर्ण विश्वास असून त्यांजवर तो त्यांच्या कार्यांची संपूर्ण जबाबदारी टाकीत असे. हाताखालचे लोक आपलेपेक्षांहि पराक्रमी असावे, या कल्पनेंत त्याला फार समाधान वाटत असे.

## खंबीर नीतिमत्ता

परस्त्रीसंबंधी शिवाजीचा अत्यंत पूज्य भाव असे, हे जगजाहीर आहे.कल्याणच्या सुभेदाराची सून शिवाजीकरतां आबाजी सोनदेवानें आणली असतां त्याची कानउघाडणी झालेली सर्वश्रुत आहेच. एप्रील १९३५ च्या मॉडर्नरिव्हूच्या अंकांत Shivaji and Captive Lady या नांवाखालीं शिवाजी त्या रूपवती स्त्रीला माता कल्पून लवून नमस्कार करीत आहे, हें दाखविणारें सुंदर चित्र आहे, तें प्रत्येकानें अवश्य पाहावे. स्त्रियांच्या अब्रूसंरक्षणासंबंधींहि त्याचे नियम अत्यंक कडक असत, हें वर वेळोंवेळीं निर्दिष्ट केलें आहेच. शिवाय त्याला कोणतेंच दुर्व्यसन नव्हतें !

## उत्कट धर्मप्रेम

शिवाजीचे धर्मप्रेम अत्युत्कट होतें. राष्ट्रोन्नत्तीवरच धर्मोन्नत्ती

अवलंबून आहे, अशी त्याच्या मनाची बालंबाल खात्री होती. या धर्मप्रीतीमुळेंच त्याचें खासगी व दरबारी शील अत्यंत उदात्त अशा प्रकारचें बनलेलें होतें. कथापुराणें ऐकण्याची त्यास अतिशय आवड होती व ती आवड पूर्ण करण्याकरितां तो कोणत्याहि अडचणीस जुमानीत नसे.

## शिवाजी व रामदास

शिवाजीवर रामदासस्वामींचा वरदहस्त होता हें आबाल-वृद्धांच्या तोंडीं आहेच. रामदास स्वामींनें नीतिमत्तेचा, देशाभिमानाचा, परस्पर विश्वास व एकीकरण यांचा धडा राष्ट्रास घालून दिला. रामदासानें महाराष्ट्रधर्माचा ह्मणजे मराठ्यांच्या कर्तव्याचा उपदेश लोकांस करून, तें कसें करावें हें लोकांस शिकविलें. रामाच्या नावानें काम करावें, रामाला तें अर्पण करावें ही निस्वार्थबुद्धि शिवाजी व इतर राष्ट्रभक्तांत रामदासानें आपल्या दिव्य वाणीनें उत्पन्न केली. समर्थ हे ध्येयाची ओळख करून देणारे होते. न्यायमूर्ती ह्मणतात त्याप्रमाणें Ramdas was the keeper of Shivaji's mind and spirit या शिवाय रामदासानें प्रत्यक्ष राजकारणांत असा कधींच भाग घेतला नाहीं हें त्याच्या दिव्यपणाचें लक्षण आहे, यांत शंका नाहीं.

## शिवाजीनें अंतकाळीं केलेला दिव्य गीतोपदेश

शिवाजीनें मरणसमयीं अष्टप्रधान व इतर मंडळीस स्वकर्तव्याची ह्मणजे स्वराज्य व स्वधर्म यांच्या रक्षणाची जाणीव देऊन देह

विनाशी असला तरी आत्मा अमर आहे असे सर्वत्रांचे समाधान केलें व या प्रकारचा गीतेतील दिव्य संदेश देऊन एकाद्या योग्याप्रमाणें त्या महात्म्यानें प्राणोत्क्रमण केलें. यावरून त्याची धर्मभावना शेवटपर्यंत किती उत्कट होती हें स्पष्ट होतें.

## परधर्मसहिष्णुता. शिवाजीचें औरंगजेबास पत्र.

शिवाजीची धर्मप्रीति इतर धर्मांस आदर दाखविण्याच्या आड येत नव्हती. इतर धर्मांस व इतर धर्मांच्या धर्मग्रंथास, इतर धर्मांच्या साधुसंतास व इतर धर्मांच्या देवालयांस अगर मशीदीस शिवाजी मान देत असे याचे वर मधून मधून दिग्दर्शन केलेंच आहे. या शिवाजीच्या सद्गुणाबद्दल खुद्द खाफीखानानें सुद्धां शिवाजीची तारीफ केली आहे.औरंगजेबानें जिझिया कर बसविला असतां शिवाजीनें त्याला आपल्या धर्मविषयक उदात्त विचाराचें पत्र लिहिलें आहे त्यातील महत्वाचा उतारा खालीं देत आहे:–

'May it please your Majesty !

If you believe in the true Divine Book and word of God [ i. e. the Quran ] you will find there [ that God is styled ] Rabbul-alamin, the Lord of all men, not Rubb-ul-musalmin, the lord of muhamadens only. Verily, Islam and Hinduism are terms of contrast. They are diverse pigments used by the true Divine Painter for blending the colour and filling in the outlines ( of his picture of the entire human species ). If it be a mosque, the call to prayer is chanted in remembrance of him. If it be a temple, the bell is rung in yearing for Him only. To show bigotry for man's creed

end practices is equivalent to altering the words of the Holy Book. To draw new lines on a picture is equivaeent to finding fault with the Painter.'

ही विचारसरणी किती उदात्त स्वरुपाची आहे! तसेंच धर्मकल्पनेचें हें वर्णन किती काव्यमय आहे! धर्मवेडाच्या कडव्या काळांत शिवाजीची ही उदात्त, सर्वधर्मसंग्राहक मनोवृत्ती अद्वितीय असून सांप्रतच्या काळांतही आदर्शभूत होण्याजोगी आहे. शिवाजी ह्मणतो:—

कुराणांतरीं परमेश्वर हा केवळ मुसलमानांचा नसून अखिल मानवी प्राण्याचा आहे, असें स्पष्ट विधान आहे. परमेश्वरानें आपल्या अखिल मानवी जीवनाचें चित्र उठावदार दिसावें ह्मणून हिंदू व मुसलमान असें वेगवेगळे रंग त्या चित्रांत भरलें आहेत. ज्या परमेश्वराची प्रार्थना मशिदींत केली जाते त्याच परमेश्वराच्या प्राप्त्यर्थ देवळांत घंटा वाजविली जाते. केवळ आपल्याच धर्माच्या आचार विचारांबद्दल वेड अगर कडवेपणा दाखविणें ह्मणजे कुराणच्या शद्बाला हरताळ फासण्यासारखें आहे. किंबहुना, परमेश्वरी मानवी जीवनचित्रांत आपण हात घालून नवीन रेषा रेखाटणें ह्मणजे त्या विश्वाच्या चित्रकाराला दूषण देण्यासारखें आहे!

*  *  *

६

# शिवाजीची धर्मप्रीति कट्टर नव्हती !

शिवाजीनें जिजाबाईच्या प्रोत्साहनानें आपत्प्रसंगीं मुसलमान झालेल्या बजाजी निंबाळकर यांस परत शुद्ध करून हिंदु धर्मांत घेतलें व आपली मुलगी सखुबाई ही त्याच्या मुलास दिली. या शिवाय नेताजी पालकरादि आणखी कांहीं इसमांना शुद्ध करून घेतल्याचें इतिहासांत नमूद आहे. यावरून त्याचें धर्मप्रेम कट्टर नव्हतें हें स्पष्ट दिसतें.

## मराठी व संस्कृत भाषेस उत्तेजन.

शिवाजीनें संस्कृत व मराठी या भाषांबद्दल स्वतः पुष्कळ कळकळ दाखविली. दरबारचे सर्व लेख मराठी भाषेंत होऊं लागले. राजव्यवहारकोश नामक दरबारी शब्दांचा कोश तयार करवून फारशी शब्दांचा उपयोग करूं नये, अशी तजवीज त्यानें केली. मराठी भाषेवर शिवाजीचे निरंतर उपकार आहेत. शिवाजीच्या मृत्यूनंतर मराठी भाषेचा फैलाव फार जोरानें झाला. फारशी भाषेचा रिवाज बंद करून संस्कृताचा प्रचार शिवाजीनें चालू करतांच मराठी भाषेस स्फुरण चढलें, आणि राज्याबरोबर भाषेचीहि वाढ झाली. राज्याच्या सीमा वाढत गेल्या, तस-

तशा मराठी भाषेच्याहि सीमा वाढल्या. त्याबरोबर हिंदुस्थानांतील इतर भाषांशीं मराठीचा सहवास घडून तिचें स्वरूप पुष्कळ बदलून गेलें. राजकारणांत, दळणवळणांत मराठी भाषेचा उपयोग अर्ध्या अधिक हिंदुस्थानांत होऊं लागल्यामुळें तिचें सामर्थ्य वाढलें. स्वराज्याच्या अभिमानानें ग्रंथकर्ते व कवी यांनीं मराठीला बरेचसें संस्कृतमय पण स्वकीय असें स्वरूप दिलें. हा सगळा परिणाम एकट्या शिवाजीच्या प्रयत्नांचा आहे. तसेंच संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन करण्याच्या कळकळीबद्दल जर कोणास शाबासकी देणें योग्य असेल, तर ती थोडीबहुत शिवाजीस देतां येईल. विद्या संपादन करून काशी वगैरे ठिकाणीं परीक्षा देऊन आलेल्या विद्वानांस बक्षिसें देण्याची वहिवाट शिवाजीनें घातली. पेशवाईत पुढें प्रसिद्धीस आलेल्या दक्षिणा संस्थेचा जनक शिवाजी होय. शिवाजीचें शाहीरांनाहि उत्तेजन चांगलेंच असे.

## स्वावलंबन.

शिवाजीला स्वराज्य, स्वधर्म, स्वभाषा यांचें त्रिविध प्रेम होतें; व तें उत्कट होतें हें वर दाखविलेंच आहे. यांस या सर्वांच्या बुडाशीं असलेली त्याची स्वावलंबन वृत्ति, हेंच कारण होय. त्याची राज्यपद्धति स्वतः अकलेनें बसविलेली असून शिवाजीनें राज्यकारभारांत रणजितसिंगाप्रमाणें परकीयांना घुसूं दिले नाहीं. त्याचें लष्कर स्वतः तयार केलेलें व स्वतःच्या लोकांच्या आधिपत्याखालीं वागलेलें असे होतें. आरमारहि स्वतः निर्मिलेलें होतें. बुंदेलखंडचा राजपुत्र शिवाजीच्या नोकरीस राहाण्यास आला असतां त्यांस शिवाजीनें उत्तरेंत स्वतंत्र राज्य संपादन करून औरंगजेबास उखडून काढण्याचा स्वावलंबनाचा सल्ला दिला, हें वर कथन केलेंच आहे.

६

## संपूर्ण विनयशिलता

शिवाजीमध्यें इतकें कर्तृत्व असून, त्याचें सर्व जीवन वैभवशाली बनलें असून, त्याला अव्वलपासून अखेरपर्यंत विजयश्री माळ घालीत असतां त्याला कधीं गर्वाचा लवलेशही शिवला नाहीं. सबंध आयुष्यांत त्याचें वचन अगर वर्तन उद्दामपणाचें असें कधींच नव्हतें; इतकेंच नव्हे तर तो

## मधुर व मितभाषणी

असून लोकांचीं मनें सहज काबीज करीत असे; हें वर कथन केलेंच आहे. शिवाय औरंगजेबाला त्यानें लिहिलेलीं पत्रें अगदीं नम्रपणाचीं असून त्याच्या पत्रामुळें औरंगजेबाला पुष्कळ वेळां भूल पडत असे असें ह्मणतात. त्याला डामडौल बिलकूल आवडत नसून त्याची

## रहाणी अगदीं साधी

होती. त्यानें आपली राजधानी एकाद्या बड्या शहरांत न करतां ती एका साध्या किल्ल्यावर स्थापन केली. सबंध व्यवहारांत

## टापटीप, काटकसर व हिशेब

ही अव्वल नंबरची होती.

असो, याप्रमाणें उत्तमोत्तम पदार्थांची खाण अशी भरतभूमि तिचा हा अद्वितीय बालक, तिला शोभणारा असा सर्व सद्गुणांची

खाण होता, असें विधान केल्यास त्या विधानाची सत्यता कोण खोडूं शकेल ? या सद्गुणांच्या बलावरच त्यानें मृतप्राय हिंदू समाजाचें पुनरुज्जीवन करून तीन राज्यांचा पाडाव केला; व अखिल भरतखंडांत अपूर्व असें स्वराष्ट्राचें स्वतंत्र राज्य स्थापन करून, त्याची कीर्ति पृथ्वीवर अजरामर करून ठेविली. त्यानें भरभक्कम पायावर स्थापिलेल्या मराठी राज्याचा पुढें गगनचुंबी आसेतुहिमाचल, भरतखंडभर पसरणारा असा प्रचंड वृक्ष निर्माण झाला ! पण येथें असा एक प्रश्न उद्भवतो कीं,

## शिवाजीचें राज्य चिरस्थायी कां झालें नाहीं ?

यासंबंधी अनेकांचे अनेक अभिप्राय आहेत. कोणी ह्मणतात, शिवाजीच्या अकाली मरणानें त्यानें स्थापिलेल्या राज्याची घडी बिघडली व त्याला राज्याची बळकटी करावयाला सवड मिळाली नाहीं. कांहीं जण ह्मणतात, जातिभेदानें राज्यनाश झाला. कविवर्य टागोर ह्मणतात कीं, जातिभेद जिवंत असून राज्य स्थापन करणें ह्मणजे वाळूच्या कणाचें घर बांधण्यासारखें आहे; व ही अशक्य गोष्ट शक्य करून दाखविण्याचा शिवाजीनें प्रयत्न केला ह्मणून तो यशस्वी झाला नाहीं. जदुनाथ सरकार ह्मणतात:—'स्वातंत्र्य—प्राप्तीनंतर पुनरपि ब्राह्मणांचें वर्चस्व व धर्माचें प्रस्थ माजलें व मराठी समाजातील एकतानता नाहींशी होऊन अखेर राज्यनाश झाला.' ते आणखीही ह्मणतात कीं, मराठेशाहीनें व्यापाराकडे लक्ष दिलें नाहीं, मुलुखगिरीनें जमविलेल्या द्रव्यावर चिरस्थायी राज्य कसें निर्माण होणार ?

पानपतची लढाई, पहिल्या माधवरावाचा मृत्यू, पेशव्यांचे

अल्पायुष्य, दुसरा बाजीराव वगैरे अनेक कारणें पुढें केली जातात. खरेशास्त्री ह्मणतात कीं, आह्मी दोषपरिपूर्ण आहोंत व इंग्रज राष्ट्रीय-गुणांनीं संपन्न आहेत ह्मणून आह्मी हरलो. शिवाजीनें मोडून टाकिलेली जहागिरीची पद्धत पेशव्यांनीं पुनः सुरू केली ह्मणून स्वार्थ बोकाळला व त्यायोगें राज्य बुडालें. या प्रत्येकांत कांहींसा सत्यांश आहे हें आह्मी कबूल करतो. परंतु खरें कारण याहून निराळें असून या सर्व कारणांचे महाकारण अगर आदिकारण आहे असें आह्मास प्रामाणिकपणें वाटतें, तें हें कीं आधिभौतिक शास्त्रांत पूर्णपणें मागासलेल्यांची–ह्मणजे आमची, त्या शास्त्रांत पूर्णपणें पारंगत असल्यामुळें प्रभावी व अत्यंत प्रबळ झालेल्या पाश्चात्य राष्ट्रांशीं गांठ पडली. The survival of the Fittest योग्यतमांचे चिरस्थायित्व, या डॉर्विनच्या तत्वानुसार दोन राष्ट्रांच्या झुंजींत इंग्रजांनें आमच्यावर मात केली, हेंच खरें. नाहींतर हींच राष्ट्रें १६ व्या शतकापूर्वीं अरब, चंगीजखान, तैमूरलंग व तुर्की सुलतान वगैरे मध्य आशियांतील पराक्रमी लोकांचे शेंकडो वर्षें अंकित होऊन दास्यपंकांत रुतलीं होतीं. १४–१५ व्या शतकांत हिंदुस्थान हे राष्ट्र या पाश्चात्यांच्या पेक्षां सर्व दृष्टीनें कितीतरी पुढें होतें. परंतु पुढें त्यांच्या किंवा जगाच्या सुदैवानें त्यांच्यांत मार्टिन लूथर अवतरला; व त्यानें पोपचें बंड मोडलें. यायोगें पुढें ग्रीक विद्यांचे व शास्त्रांचे पुनरुज्जीवन होऊन युरोपखंडभर शिक्षण सर्वत्र पसरलें; तेथें सतराव्या शतकापासून आधिभौतिक शास्त्रांची कल्पनातीत वाढ होण्यास सुरवात होऊन त्यांचा अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत एकसारखा उत्कर्षच होत चालला. यायोगें पाश्चात्य राष्ट्रें पौर्वात्य राष्ट्रांपेक्षां अत्यंत प्रभावी, प्रबळ झालीं व त्यांनीं आशिया, अमेरिका

प्रत
नं.
ता.



व आफ्रिका हीं सर्व खंडें व्यापून सोडिलीं. त्या सर्व राष्ट्रांत धूर्त व कावेबाज असे जे इंग्रज त्यांच्याशीं आमची गांठ पडली. राष्ट्र ह्मणजे काय ? राष्ट्राला बळकटी अगर ऊर्जितावस्था कशानें येते ? अर्थशास्त्र ह्मणजे काय ? अर्थोत्पादन कसें करावें ? सार्वजनिक लोकशिक्षणाचे महत्त्व काय ? पदार्थविज्ञान व रसायन शास्त्र यांच्या योगानें उत्तम यंत्रसामुग्री कशी निर्माण करावी ? या सर्व गोष्टींचें ज्ञान युरोपांतल्या सामान्य लोकांना सहज होत असे. शास्त्रांत जागतिक अनुभव तत्त्वरूपानें सांठविलेला असतो. आमच्या मुत्सद्यांचा अनुभव ह्मणजे फक्त एका व्यक्तीचा ! तेव्हां जागतिक अनुभवापुढें एका व्यक्तीच्या अनुभवाचा निभाव कसा लागेल ? ह्मणून बुद्धीनें व कल्पकतेनें इकडील लोक कमी नसतांहि, त्यांस शास्त्रीय व्यावहारिक शिक्षण न मिळाल्यामुळें ते सर्वथैव पंगु राहिले आणि हें पंगुत्व उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलें. १००।१५० वर्षांपूर्वी ही राष्ट्रं जर जपानांत शिरतीं, तर जपानचीहि हिंदुस्थानसारखीच स्थिति झाली असती. खेडवळांचा शहरवासीयाचे बरोबर संबंध आला ह्मणजे शहरवासी खेडवळांना जसें सहज फसवून लुबाडूं शकतात तशांतलीच ही स्थिति आहे. शिवाजी अगर पहिला माधवराव आणखी १०।२० वर्षें जगते अगर पानपतची लढाई न होती अगर आणखी वर नमूद केलेली कारणें घडून न येतीं तर फार तर १८०२ सालीं वसईचा जो तह झाला तो १८५२ सालीं झाला असता इतकेंच !

* * *

७

# शिवाजीची योग्यता.

असो, आतां शिवाजीचें अवतार—कार्य कोणतें, त्या कार्याची परिपूर्तता करण्यास योग्य असे त्याचे अंगांत अनुवंशिक, अनुराष्ट्रिक व स्वतंत्र असे कोणते गुण होते, व भरभक्कम पायावर रचिलेली त्याची इमारत चिरस्थायी कां झाली नाहीं, याचें सांगोपांग विवेचन वर आलें आहे. आतां त्यानें आपल्या योग्यतेनुसार महाराष्ट्राच्या, हिंदुस्थानच्या व जगाच्या इतिहासांत कोणतें स्थान पटकाविलें आहे, त्याचा हल्लीं दास्यपंकांत रुतलेल्या हिंदी राष्ट्राला काय संदेश आहे व शिवचरित्रापासून सांप्रत काळीं काय बोध घेण्यासारखा आहे, याचें दिग्दर्शन केलें ह्मणजे आमचें काम आटोपलें.

## महाराष्ट्राच्या इतिहासांत शिवाजीचें स्थान.

अशोकानंतर इतका दिव्य पुरुष झाला नाहीं. बाबराप्रमाणें शूर व सोशिक, अकबराप्रमाणें सर्वांवर समदृष्टि ठेवून राज्यकारभाराची व्यवस्था करण्यांत कुशल, शहाजहानाप्रमाणें काटकसर करून प्रजेच्या सौख्यांत दंग असणारा असा शिवाजी, प्रतापी मोंगल बादशहांच्या अनेक गुणांचा निष्कर्ष होता. परंतु बाबर व अकबर हे परदेश जिंकण्याच्या दोषापासून मुक्त नाहींत. अकबराप्रमाणें

शिवाजी क्रूर नव्हता. जहांगीर किंवा शहाजहान यांच्याप्रमाणें ऐषआरामी नव्हता. औरंगजेबाची जबरदस्त उद्योगशीलता शिवाजीच्या ठिकाणीं असूनहि ज्या कपट व विश्वासघात यांच्या योगानें औरंगजेबाचा नाश झाला, ते दुर्गुण शिवाजीस शिवले नाहींत.

## जागतिक इतिहासांत शिवाजीचें स्थान

या संबंधीची मीमांसा रा. राजवाडे यांनी फार उत्कृष्ट रीतीनें केली आहे. त्यांतील कांहीं उतारे खालीं देत आहे:—

'शिवाजी ही विभूति महाराष्ट्रांत कोणतें कार्य साधण्याकरितां अवतीर्ण झाली? लोकांचें स्वातंत्र्य–हरण करून दिग्विजय करण्याकरितां शिवाजी उत्पन्न झाला, कीं स्वराज्य व स्वधर्म यांचें संरक्षण करण्याकरितां त्याचा अवतार होता? स्वराज्य आणि स्वधर्म यांचें संरक्षण करण्याचा उच्च, उदात्त व पवित्र हेतु मनांत धरून शिवाजीचे प्रयत्न चालले होते, हें सर्वत्र मान्य आहे; तेव्हां परकीय लोकांचें स्वातंत्र्य हरण करणाऱ्या, अर्थात् एका नीच दुष्ट व अपवित्र हेतूनें प्रोत्साहित झालेल्या अलेक्झांडर, सीझर, नेपोलिअन ह्या दिग्विजयी पुरुषांशी शिवाजीची तुलना करणें अयोग्य आहे. धैर्य, शौर्य, पराक्रम, कर्तृत्वशक्ति इत्यादि गुणासंबंधानें शिवाजीशी ह्या पुरुषांची तुलना केली असतां चालेल; परंतु हेतूच्या पवित्रतेसंबंधीं जेथें विचार करावयाचा असेल, तेथें ह्या दिग्विजयी व दुष्ट पुरुषांशी तुलना काय कामाची? अशा ठिकाणीं स्वातंत्र्यार्थ खटपट करणाऱ्या पवित्र महापुरुषांचाच तेवढा प्रवेश होणें अवश्य आहे.

वास्तविक पाश्चात्य महापुरुषांशीं तुलना केल्यानेंच शिवाजीच्या महत्वाची इयत्ता ठरणार आहे, असा प्रकार बिलकुल नाहीं. शिवाजीची योग्यता स्वयंसिद्ध आहे; अलेक्झांडराप्रमाणें शिवाजीनें आपल्या स्नेह्यासोबत्यांस ठार मारिलेलें नाहीं; सीझराप्रमाणें आपल्या बायकोस सोडून दिलेलें नाहीं; बोनापार्टाप्रमाणें परराष्ट्रांचें स्वातंत्र्य पायाखालीं तुडविले नाहीं, क्रॉम्वेलाप्रमाणें कोण्या प्रांतांतील लोकांची कत्तल उडविली नाहीं. फ्रेडरिक धी ग्रेटप्रमाणें नीच दुर्गुण शिवाजीच्या अंगीं नव्हते. शिवाजीचें वर्तन न्यायाचें, नीतीचें, पराक्रमाचें स्वधर्मपरायणतेचे व परधर्मसहिष्णुतेचें होतें. अनेक लढायांत विजय संपादन करणें; मैदानांत, समुद्रतीरावर किंवा डोंगरावर तीनचारशें किल्ले बांधणें, नवीन सैन्य तयार करणें, नवीन आरमार निर्मिणें, नवे कायदे करणें, स्वभाषेला उत्तेजन देणें, कवींना आश्रय देणें, नवी शहरें वसविणें, स्वधर्म स्थापन करून त्याचें ऐश्वर्य वाढविणें, सारांश स्वराज्याचा उद्धार करून स्वदेशाला स्वतंत्र व सुखी करणें, ह्या लोकोत्तर कृत्यांनीं जर कोण्या पुरुषानें ह्या भूमंडळाला अक्षय्य ऋणी करून ठेविले असेल तर ते शिवाजीनेंच होय. शिवाजीची खासगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते, कीं त्याच्याशीं तुलना करावयास जी जी ह्मणून व्यक्ति घ्यावी ती या नाहीं त्या गुणानें शिवाजीहून कमतरच दिसेल. या अवतारी पुरुषाविषयीं लिहितां लिहितां समर्थ ह्मणतात " तयाचे गुणमहत्वासी ! तुलना कैंची ? "

## शिवाजीचा हिंदी राष्ट्राला संदेश.

स्वधर्माचा उद्धार व हिंदूंची केविलवाण्या स्थितींतून सुटका

ही घडवून आणण्यास स्वातंत्र्याशिवाय तरणोपाय नाहीं, हें शिवाजीनें ताडिलें; व तत्सिद्ध्यर्थ प्रचंड खटाटोप करून स्वराज्य-स्थापना केली. स्वातंत्र्य प्राप्तीमुळें पुढं आर्थिक, धार्मिक, सामाजिक प्रश्न सुटूं लागले, महाराष्ट्र सुसंपन्न झालें. हिंदूंचा दर्जा वाढला. धर्मांतर झालेल्या हिंदूंस स्वधर्मांत घेण्यांत येऊं लागले, इतकेंच नव्हे तर शिवाजीनें बीं पेरून संगोपन केलेला स्वातंत्र्यवृक्ष कालांतरानें इतका फोफावला कीं, त्याला गगन व भूमि ही ठेंगणी भासूं लागलीं. यावरून शिवाजीचा सांप्रतच्या काळीं हिंदी राष्ट्राला असा संदेश आहे कीं, स्वातंत्र्यप्राप्तिविना हिंदुस्थानचें सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक वगैरे प्रश्न सुटणार नाहींत व जगांतल्या राष्ट्रांत हिंदुस्थानचा दर्जा वाढणार नाहीं. आपल्या दीन हीन, पतित, केविलवाण्या स्थितीला एकच जालीम औषध ह्मणजे स्वातंत्र्यप्राप्ति. हाच त्या पुरुषाचा पतित हिंदी राष्ट्राला दिव्य संदेश! लो० टिळकांची शिकवणूक हीच होती व तदर्थ त्यांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. याच मंत्राचा ठासून उपदेश सतत करीत असल्यामुळें जवाहरलाल व सुभाषबाबू यांना आपलीं आयुष्यें तुरुंगांत कंठावी लागत आहेत.

## शिवचरित्रापासून बोध.

सुरवातीच्या लेखावरील जदुनाथ सरकारांचें अवतरण दिल्याप्रमाणें हिंदी राष्ट्राची कितीहि खच्ची केली तर तें मरत नाहीं. उलट एखाद्या वट-वृक्षाप्रमाणें त्याची जोरानें वाढ होते. ह्मणून हल्लींच्या असहाय्य परिस्थितींत सुद्धां आपण निराश होण्याचें कारण नाहीं.

आपल्यामधील आत्मविश्वास वाढावा म्हणून शिवाजीचें चरित्र प्रत्येकानें पठण करणें जरूर आहे. राष्ट्रधुरा वहाणाऱ्यांनीं तर शिवाजीचे सर्व नाहीं तरी निदान बरेच गुण आपल्या अंगांत आणणें अवश्य आहे. ज्यांना ह्मणून कांहीं राष्ट्रकार्य करावयाचें आहे त्यांनीं शिवाजीचा एकादा तरी सद्गुण आपल्या अंगांत प्राप्त करून घेतला पाहिजे. सामान्य जनसमुहानेंसुद्धां शिवचरित्राचें पठण, श्रवण, मनन, निदिध्यास करून अखिल भरतखंडभर शिवमय वातावरण निर्माण केलें पाहिजे, ह्मणजे असल्या वातावरणांत शिवाजी सारख्या दिव्य विभूति निर्माण होऊन त्या या प्राचीन पण पतित अशा मातृभूमीचा सहज उद्धार करूं शकतील.

REFBK-0005443

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ...

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ..........
डा. गं.

# परिशिष्ट.

*Barrister Jayaswal on the revival of Hindu polity by Shivaji.*

The period after 700 A. C. is a period of darkness and disruption. Popular institutions decayed and Hindu traditions dwindled. The causes are yet to be investigated.

But when there was a Hindu revival in the time of Shivaji and the Sikhs, the Sikhs as a polity failed. They failed because they could not connect themselves with the past. They followed a system which prevailed around them and established a polity of one man's rule. Guru Govind wanted to remedy it but the attempt brought about 'no man's rule'. It was the 'Padashahi' the moghul form in success and in defeat, in rise and in fall. But the movement in the Maratha country had a different history. There they looked into past history and drew up a constitution and founded a polity on materials that were easily available to them but the materials which connected them with the past. They consulted the Mahabharat and the Shukraniti and found that King should reign but not rule, that Government should be vested in a Ministry of Eight Ministers. And they founded the Ashtapradhan. They searched

out technical terms from political literature of the country and drew up a Rajakosha or Book of State Terms. Yet the system tried was only one portion of Hindu polity, one half of the whole body. They had the Parishad but they had not the Paurajanapad. To their great credit it must however be said that in modern times they were the first to realise that one man's rule was not allowed by the wisdom and experience of their fore-fathers, that it was foreign to the genius of their Shastras. Their limitations were the limitations of darkness and ignorance about the Constitutional history of the country, a darkness which we have not yet fully removed three centuries after.

### बॅरिस्टर जयस्वाल ह्मणतातः–

हिंदुस्थानचा इ. स. ७०० नंतरचा काल अज्ञानाचा व ऱ्हासाचा आहे. यानंतर भारतीय सार्वजनिक संस्था व परंपरा यांचा दिवसेंदिवस नाश होतच गेला. त्याची कारणें अद्यापि शोधून काढावयाचीं आहेत. परंतु पुढें शिवाजी व शीख यांच्या उदयाचे वेळीं ज्यावेळीं हिंदूंचें पुनरुज्जीवन झालें, त्यावेळीं शिखांना स्वतंत्र शासन-पद्धति निर्माण करतां आली नाहीं. त्यांना आपली राज्यपद्धति प्राचीन राज्यपद्धतीशीं जोडतां आली नाहीं. त्यांनीं 'एका व्यक्तीचें अधिराज्य' या मोंगली पादशाहीचें सर्वस्वी अनुकरण केलें. महाराष्ट्रांतील प्रकार मात्र निराळा झाला. मराठ्यांनीं महाभारत व शुक्रनीति या प्राचीन ग्रंथांच्या आधारें आपली शासन–पद्धति निर्माण करून भूतकालाशीं आपला संबंध जोडिला. प्राचीन ग्रंथांत त्यांना असें आढळून आलें कीं राजानें राज्य करावें पण सुलतानशाही

गाजवूं नये व राजसत्ता अष्टप्रधानाच्या मंत्रिमंडळांत अधिष्ठित असावी, हीं तत्त्वें गोंविली गेलीं आहेत. तदनुसार त्यांनीं अष्टप्रधान-मंडळाची प्रस्थापना केली व पारिभाषिक राजकीय शब्दांचा राजकोश निर्माण केला. याप्रकारें भारतीय शासनपद्धतीच्या अर्ध्या भागाचें पुनरुज्जीवन झालें. पौर–जानपद संस्थांचे मात्र पुनरुज्जीवन झालें नाहीं. परंतु आपल्या सुज्ञ व अनुभविक पूर्वजांना एकसत्ताक राज्य संमत नव्हतें व त्यास शास्त्राधार नाहीं हें अर्वाचीन कालीं फक्त मराठ्यानीं जाणिलें याबद्दल त्यांची तारीफ करणें भाग आहे. मराठ्याच्या राजपद्धतींतील उणेपणाबद्दल, देशाच्या राज्यघटनात्मक इतिहासासंबंधी असलेल्या तत्कालीन अज्ञान अंधकारालाच जबाबदार धरिलें पाहिजे. तीनशें वर्षांनंतरही अजून त्या अंधःकाराचें पूर्ण निरसन झालें नाहीं. यावरून शिवकालीन वस्तुस्थिति काय असेल याची सहज कल्पना करतां येईल.